विलायतेस १७५१ सनांत जुनी चाल मोडून नवी चाल चालू झाली.

रविसाधन.

डाकतर ब्राड्ली साहेबांनीं रवीचे वेध केले होते; त्यांतून ७२० वेध घेऊन त्यांपासून इसवी सन् १७५२ सालचे जानेवारीचे १ ले तारखेचे दोन प्रहरीं रवीचा भोग किती असावा हें मनशियर डि लांबर या नांवाचे एका फ्रेंच ज्योतिष्यानें पाहिलें. ते भोग याप्रमाणें आले.

*ग्रिनिच, दोन प्रहर. जानेवारी तारीख १ सन १७५२ इ०

	रा.	अं.	क.	वि.
सायन मध्यम रवि ..	९	१०	३१	३२·२
" रवीचें उच्च ..	३	८	३९	३१

त्याचप्रमाणें, त्यानें ग्रिनिच व पारिस या शहरांतील वेधशाळांत जे वेध केले होते, त्यांतून कित्येक घेऊन त्यांत आपण घेतलेले वेध घालून सुमारें ४०० वेधांपासून १८०२ तील रवीचे भोग सिद्ध केले, ते येणेंप्रमाणें.

ग्रिनिच, दोन प्रहर. जानेवारी तारीख १ सन् १८०२ इ०.

	रा.	अं.	क.	वि.
सायन मध्यम रवि	९	१०	२४	५०·६
" रवीचें उच्च	३	९	३१	७

या दोन वर्षांचे रवीचे स्थितीवरून आह्मीं शके १७०० या वर्षाचे निरयन सौर मेषसंक्रांतीचे वेळेस रवीचे भोग किती असावे ते काढले, ते याप्रमाणें आले.

---

* इंग्लंडांत ग्रिनिच या ठिकाणीं वेध शाळा आहे.

मुकाम मुंबई. शके १७००, मेषसंक्रांत.

	रा.	अं.	क.	वि.
सायन मध्यम रवि	०	१८	२४	१६
,, रवीचें उच्च	३	९	६	३८

शके १७०० शांची ह्मणजे सन् १७७८ रांची मेषसंक्रांत एप्रिलचे १० वे तारखेस सूर्योदयानंतर ३ घ० २०प० नी झाली, त्यावेळेची ही वर दिलेली रवीची स्थिति आहे.

रवीची एक प्रदक्षिणा एक सायन सौरवर्षांत होत्ये. परंतु हिंदूलोकांचें वर्ष निरयन आहे, आणि त्याचें मान सूर्य सिध्दांताप्रमाणें ३६५ दि० १५ घ० ३१·५२३३३ प० आहे. तेव्हां इतक्या काळांत रवीची जी गति येत्ये ती खालीं दिली आहे.

	रा.	अं.	क.	वि.
मध्यम रवीची सायनगति एका सौरवर्षांत	१२	०	०	५८·५२०८
रवीचे उच्चाची गति	०	०	१	१·९१३

एका वर्षांत अयनांशांची वृद्धि ५०·१, विकळा इतकी आहे, असें यंत्रादिकांच्या वेधांवरून स्पष्टपणें कळून आलें आहे. हीच गति ग्रहलाघवांत ६० विकळा, आणि सूर्य सिद्धांतांत ५२ विकळा, याप्रमाणें धरली आहे.

ग्रह, तारा यांचें आकर्षण पृथ्वीवर पडून त्या संबंधानें जो गतींत फेर पडतो त्यामुळें सूर्याची दृश्य मध्यम गति सर्वदां सारखी नाहीं. यामुळें पुष्कळ वर्षांमागचें किंवा पुढचें गणित करणें झाल्यास त्यास कालांतराचा संस्कार करावा लागतो. हा संस्कार किती असावा हें पाहाण्याकरितां फार प्राचीनकालीं केलेले वेध वगैरे ताडून पाहिले. त्यांवरून पुढील अंक सांपडले आहेत.

सायन मध्यम रवीस
कालांतरानें पडणारा फेर $\Big\}$ = + $0''.0001221४\ व^2$

यांत व = इष्ट शालिवाहनशक–१६७२.

त्याचप्रमाणें उच्चांत जो भेद पडतो तो ०''.०००२०३७९व^2 इतका आहे.

क्रांतिवृत्ताचे तिर्यकूत्वामध्यें जो भेद पडतो तो
–०''.४८३६८ व^2 – ०''.०००००२७ व^2 इतका आहे.

रवीचे परम फलामध्यें जो भेद पडतो तो.
–०''.१८८४४४ व + ०''.००००६७२१ व^2 इतका आहे.

यांत व^2=इष्ट शक = १७३२.

मध्यम रवीस स्पष्ट करण्याकरितां फल संस्कार पुढील सारणीचे योगानें काढला आहे.

क = रविमध्यमकेंद्र.

फलसंस्कार =	–१°	५५'	२६''.४	भुजज्या क.
	+	१	१२.७	भुजज्या २ क.
	–		१.१	भुजज्या ३ क.

मनशीयर डि लांबर साहेबांनीं पुष्कळ वेधांच्या अनुरोधानें क्रांतिवृत्ताचे तिर्यक्त्वाचें मान काढलें आहे, तें १८०० सनांत म्हणजे शके १७२२ सांत २३ अं. २७ क. ५७ वि. होतें.

हीं जीं मागें अनुमानें दिलीं त्यांवरून रविसाधनाचीं कोष्टकें तयार केलीं आहेत.

कोष्टकांचें वर्णन.

१ लें कोष्टक. याकोष्टकांत, सन् १८०० पासून १९०० पर्यंत प्रतिवर्षाचे जानुवारी महिन्याचे १ ले तारखेचे दोनप्रहरचे

सायनमध्यमरवीचे व त्याचे उच्चाचे भोग दिलेले आहेत.

२ रें कोष्टक. यांत शके १७०० पासून १८०० पर्यंत प्रतिवर्षाचे मेषसंक्रमणाचे दिवशींचे प्रातःकाळचें सायनमध्यमरवीचे व त्याचे उच्चाचे अंश दिले आहेत.

३ रें. कोष्टक. या कोष्टकावरून पाहिजे त्या वर्षीचा रवि तयार करितां येतो. या कोष्टकावरून रवि तयार करणें झाला ह्मणजे पहिल्यानें शकारंभींचे क्षेपकांक मांडून सांगितलेले शकाचे शतकाचे क्रमाप्रमाणें गतिघेऊन त्यांत मिळवावी ह्मणजे इष्ट शकाचे मेषसंक्रांतीचे वेळचा रवि तयार होतो. उदाहरण शके १७७२ यावर्षाचा रवि तयार करण्याचा आहे, तर

	रा.	अं.	क.
क्षेपकांक........	११	२०	४६·१
वर्षे १७०० ....गति.		१६	१५·४
७०० ...., ,,		११	२२·८
७० ...., ,,		१	८·३
२ ...., ,,			२·०
शके १७७२	०	१९	३४·६

हा मेषसंक्रांतीचे वेळचा सायनमध्यम रवि झाला. परंतु या वर्षी मेषसंक्रांत सूर्योदयानंतर ४१ घ० ९ प० नीं होते, ह्मणून सूर्योदयींचा रवि करणें झाल्यास, तितके घटकांची गति वजा करावी लागते.

उदा०	रा.	अं.	क.
शके १७७२ मेषसंक्रमणींचा मध्यम रवि	०	१९	३४·६
४१ घ० ९ प० यांची गति. कोष्टक ६ वें			−४०·६
उदयिक मध्यम रवि	०	१८	५४·०

४ थें कोष्टक. यांत मध्यम रवींत कालांतरानें जो भेद पडतो तो दिला आहे.

टीप. या कोष्टकांत जो संस्कार दिला आहे तो मध्यम रवीस द्यावा लागतो इतकेंच नाहीं तर इतर दुसरे ग्रहांस ही द्यावा लागतो.

५ वें कोष्टक. या कोष्टकांत सायनमध्यमरवीची दिनगति दिली आहे.

६ वें कोष्टक. या कोष्टकांत सायनमध्यमरवीची घटि गति दिली आहे.

७ वें कोष्टक. या कोष्टकांत सायनमध्यमरवीस स्पष्ट करण्याकरितां जो फलसंस्कार द्यावा लागतो तो दिला आहे. या कोष्टकाचें उपकरण रविमध्यमकेंद्र आहे. कालांत्तर फल संस्कारांत भेद पडतो, परंतु या कोष्टकांत जो संस्कार दिला आहे त्यांत शके १७३२ सांच्या मागें किंवा पुढें ३०० वर्षेपर्यंत एक कलाही भेद पडावयाचा नाहीं.

८ वें कोष्टक. यांत सूर्याचा चल कर्ण, स्पष्टगति, आणि बिंब हीं दिलीं आहेत. या कोष्टकाचें उपकरण रविमध्यमकेंद्र आहे.

९ वें कोष्टक. या कोष्टकांत क्रांतिवृत्ताचे विषुववृत्ताशीं जें तिर्यक्त्वतें दिलें आहे. या कोष्टकावरून असें ध्यानांत येईल कीं हें तिर्यक्त्व दिवसानुदिवस कमी होत चाललें आहे.

१० वें कोष्टक. या कोष्टकावरून सायन सूर्याची क्रांति काढतां येते. या कोष्टकाचें उपकरण सायन सूर्याचे भोग. या कोष्टकांतील परम क्रांतींत ७०० वर्षेपर्यंत एका कळेचाही फेर पडणार नाहीं.

११ वें कोष्टक. सूर्याचे भोगावरून त्याचे विषुवांश या कोष्टकावरून काढतां येतात. या कोष्टकांत जे अंक दिले आहेत ते रवि-

भोगास धन ऋण चिन्हांप्रमाणें मिळवावे किंवा वजा करावे ह्मणजे विषुवांश येतात.

१२ वें कोष्टक. घडियाळें सूर्याच्या मध्यम गतीचे मानानें चालतात, आणि सूर्याचे वेधावरून जो काळ येतो तो स्पष्ट काळ येतें; ह्मणून स्पष्ट सूर्यावरून घडियाळ नीट करणें झाल्यास स्पष्ट काळास कांहीं संस्कार करावा लागतो तो संस्कार या कोष्टकांत दिला आहे.

१३. वें कोष्टक. कालांतरीं रवीचे परम फलांत जो फेर पडतो तो या कोष्टकांत दाखविला आहे.

कोष्टकांवरून.

गणित करण्याचा प्रकार.

अशी कल्पना करा कीं शके १७७२ रांत कार्तिक शुद्ध ५, मीचे दिवशीं सूर्योदयानंतर २७ घटिका ८ पळें यावेळेस स्पष्ट रवि त्याची क्रांति, विषुवांश, मंदकर्ण, बिंब वगैरे काय होतीं हें काढावयाचें आहे.

आतां पहिल्यानें मेषादी पासून, इष्टतिथीपर्यंत किती दिवस होतात तें पंचांगावरून किंवा कालसाधन कोष्टकाचे आधारानें किंवा दुसरे कोणत्येही रितीनें काढावें. शके १७७२ रांत मेषादी पासून कार्तिक शुद्ध ५ मी पर्यंत २१२ दिवस होतात. (काल साधन कोष्टकांतील उदाहरण पाहा).

दुसरे कोष्टकांतून शके १७७२ रांचे मेषादीचे वेळेचा सायन मध्यम रवि.

रा.	अं.	क.		रा.	अं.	क.	
०	१८°	५४·०	येतो आणि उच्च.	३.	१०.	२०·९	येतें.

यांत ५ वे कोष्टकांतून २१२ दिवसांची आणि ६ वे कोष्ट-

कांतून २७ घ० ८ प० यांची गति घेऊन त्यांत मिळविली तेव्हां पुढील प्रमाणें मानें आलीं.

	सायनमध्यमरवि.			उच्च.		
	रा.	अं.	क.	रा.	अं.	क.
२ रें. को० शके १७७२	०	१८	५४·०	३	१०	२०·९
५ वें. को० २१२ दिवस	६	२८	५७·४			०
६ वें. को० २७ घ० ८ प०			२६·७			०
शके १७७२ कार्तिक शुद्ध ५ सायनमध्यमरवि –	७	१८	१८·१	३	१०	२०·९

मध्यमरवींत उच्च वजा केलें ह्मणजे रविकेंद्र होतें.

	रा.	अं.	क.
मध्यम रवि..	७	१८	१८·१
उच्च......	३	१०	२०·९
रविकेंद्र....	४	७	५७·२

७ वे कोष्टकांत ४ राशि ७ अंश यां समोर फल संस्कार –१ अं० ३३·४ क० आहे, आणि ४ रा. ८ अंश यांसमोर –१ अंश, ३२·१ क० आहे. तेव्हां अनुमानानें ४ रा. ७ अंश आणि ५७ कला यांचा फल संस्कार –१ अं. ३२·१ कळा येईल.

हा संस्कार वरील मध्यमरवींत वजा केला ह्मणजे स्पष्ट रवि होईल.

	रा.	अं.	क.
मध्यम रवि	७	१८	१८·१
फलसंस्कार		—१	३२·१
स्पष्टरवि	७	१६	४६·०

याप्रमाणें शके १७७२ रांत कार्तिक शुद्ध ५ चे दिवशीं सूर्योदयानंतर २७ घ. ८ प. यावेळेस स्पष्ट रवि ७ रा., १६ अं. ४६ क. इतका होतो.

रविगति, चल कर्ण वगैरे काढणें झाल्यास.

८ वे कोष्टकांत, रविकेंद्र ४ रा. ८ अं. यांसमोर पाहिलें ह्मणजे.

चलकर्ण....... ०·९९०८
दिनस्पष्टगति. .... ६०·२ कला
रविबिंब. ...... ३२·२ कला

चंद्रग्रहण किंवा सूर्यग्रहण काढतांना रवि बिंबाची गरज लागत्ये. मंगलादिक दुसरे ग्रह भूकेंद्र करण्याचे वेळेस चल कर्णाची गरज लागत्ये.

वर काढलेल्या सायन रवीपासून विषुवांश, क्रांति काढणें झाल्यास.

९ वे कोष्टकावरून शके १७७२ रांतले क्रांतिवृत्ताचें तिर्यकूत्व २३ अंश. २७ कळा.

१० वे कोष्टकावरून. स्पष्ट रवि ७ रा. १६ अं. ४६ क. यासमोर (अनुमानानें) रवीची क्रांति १६ अं. ४९ क. दक्षिण आहे असें समजतें.

११ वे कोष्टकांत स्पष्टरवि ७ रा. १६ अं. ४६ क. यां समोर संस्कार −२अं. २८ क. हा रवीस दिला ह्मणजे सूर्याचे विषुवांश.

	रा.	अं.	क.
सायन स्पष्टरवि.	७	१६	४६
संस्कार.		−२	२८
रवीचे विषुवांश		१४	१८

१२ वे कोष्टकांत. स्पष्ट रवि ७ रा. १७ अं. या समोर −४० पळें आहेत. यावरून असें समजतें कीं कार्तिक शुद्ध ५मीचे दिवशीं सूर्याचा वेध करून जर घडियाळ शुद्ध करावयाचें आहे, तर त्या-

दिवशींच्या स्पष्टकाळांतून ४०पळें वजा करावीं ह्मणजे घडियाळाचा शुद्धकाळ झाला.

याकाळाशीं जर घडियाळ मिळत असलें तर बरें आहे, नाहीं तर जेवढें अंतर पडेल तेवढी घडियाळांची चुकी समजावी

गणित करितांना अंक मांडण्याची तऱ्हा पुढीलपत्रांत दाखविली आहे ती पाहावी.

शके १७७२ कार्तिकशुद्ध ५ सूर्योदयानंतर २७ घ० ८ प०

	सायनमध्यमरवि.			उच्च.		
	रा.	अं.	क.	रा.	अं.	क.
२ रें. को० शके १७७२ ...	०	१८	५४·०	३	१०	२०·९
४ थें.को० १७७२ ...			०			०
५ वें. को० दिवस २१२ ...	६	२८	२६·७			
६ वें. को० २७ घ० ८ प०			२६·७			
मध्यम रवि.	७	१८	१८·१	३	१०	२०·९
उच्च	३	१०	२०·९			
रविकेंद्र	४	७	५७·२			
७ वें. को० फलसंस्कार		१	३२·१			
सायन स्पष्ट रवि.	७	१६	४६·०			

रा. अ.
८ वें. को० उप. ४ १८ .... चलकर्ण .... ०·९९०८
,, ,, ... स्पष्ट दिनगति ...... १ ०·२
,, ,, ... रवि बिंब ...... ० ३२·२

रा. अं. क. अं क
१० वें को० उप. ७ १६ ४६ स्पष्टक्रांति दक्षिण १६ ४९

रा. अं. क.
रा. अं. क. सायन स्पष्ट रवि. ७ १६ ४६·०
११ वें. को० उप. ७ १६ ४६ संस्कार २ २८
रवींचे विषुवांश ७ १४ १८

१२ वें. को० उद. ७ १४ १८ स्पष्ट काळचा संस्कार. -४० पळें

टीप. गणितकारांनीं इतकें लक्षांत ठेवावें कीं हें गणित मुंबईचे याम्योत्तरेचें केलें आहे. ह्मणून मुंबईशिवाय दुसरे ठिकाणचें गणित करणें झाल्यास मध्यम सूर्यास रेखांतराचा संस्कार करावा. रेखांतराच्या घटिका समजल्या ह्मणजे ६ वे कोष्टकाचे आधारानें हें काम सत्वर करितां येतें. ठिकाण मुंबईचे पश्चिमेस असलें तर रेखांतरापासून आलेल्या कला मध्यम सूर्यांत मिळवाव्या, पूर्वेस असल्यास वजा कराव्या.

उदा० काशीचा सूर्य करणें झाल्यास. काशीचें १० अं. ३ क. मुंबईचे पूर्वेस आहे. यांचे कालमान १ घ. ४० प. झालें. ६ वे कोष्टकाप्रमाणें इतक्या वेळांत १'७ कला भेद येतो. काशी पूर्वेस आहे, ह्मणून मुंबईचे रवींत इतक्या कला वजा केल्या ह्मणजे काशीचा रवि येईल.

ग्रहणाचें गणितांत पर्वांतींचे सूर्यास हा भेद करण्याची गरज नाहीं; कारण तिथि करितांना पर्वांतासच रेखांतर संस्कार केला असतो.

कोष्टक १.

संन् १८०० पासून १९०० पर्यंत प्रतिवर्षाचे जानुवरी महिन्याचे १ले तारिखेचे दोन प्रहरीं, मुंबईस, मध्यम रवि आणि त्याचें उच्च, यांचे सायनभोग.

इस.संन्	मध्यम सा.सू.	रविउच्च.	इस.संन्	मध्यम सा.सू.	रविउच्च.
	रा० अं० क०	रा० अं० क०		रा० अं० क०	रा० अं० क०
१८००	९ १० ४१·५	३ ९ २९·१	१८३०	९ १० २५·७	३ १० ०·
१८०१	९ १० २७·२	३ ९ ३०·१	१८३१	९ १० ११·४	३ १० १·०
१८०२	९ १० १२·९	३ ९ ३१·१	१८३२	९ ९ ५७·७	३ १० २·१
१८०३	९ ९ ५८·५	३ ९ ३२·१	१८३३	९ १० ४१·८	३ १० ३·१
१८०४	९ ९ ४४·२	३ ९ ३३·२	१८३४	९ १० २७·५	३ १० ४·१
१८०५	९ १० २९·०	३ ९ ३४·२	१८३५	९ १० १३·२	३ १० ५·२
१८०६	९ १० १४·७	३ ९ ३५·२	१८३६	९ ९ ५८·९	३ १० ६·२
१८०७	९ १० ०·४	३ ९ ३६·३	१८३७	९ १० ४३·७	३ १० ७·२
१८०८	९ ९ ४६·०	३ ९ ३७·३	१८३८	९ १० २९·३	३ १० ८·३
१८०९	९ १० ३०·९	३ ९ ३८·३	१८३९	९ १० १५·०	३ १० ९·३
१८१०	९ १० १६·५	३ ९ ३९·४	१८४०	९ १० ०·७	३ १० १०·३
१८११	९ १० २·२	३ ९ ४०·४	१८४१	९ १० ४५·५	३ १० ११·४
१८१२	९ ९ ४७·९	३ ९ ४१·४	१८४२	९ १० ३१·२	३ १० १२·४
१८१३	९ १० ३२·७	३ ९ ४२·५	१८४३	९ १० १६·८	३ १० १३·४
१८१४	९ १० १८·४	३ ९ ४३·५	१८४४	९ १० २·५	३ १० १४·५
१८१५	९ १० ४·०	३ ९ ४४·५	१८४५	९ १० ४७·३	३ १० १५·५
१८१६	९ ९ ४९·७	३ ९ ४५·६	१८४६	९ १० ३३·०	३ १० १६·५
१८१७	९ १० ३४·५	३ ९ ४६·६	१८४७	९ १० १८·७	३ १० १७·५
१८१८	९ १० २०·२	३ ९ ४७·६	१८४८	९ १० ४·३	३ १० १८·६
१८१९	९ १० ५·९	३ ९ ४८·६	१८४९	९ १० ४९·१	३ १० १९·६
१८२०	९ ९ ५१·५	३ ९ ४९·७	१८५०	९ १० ३४·८	३ १० २०·६
१८२१	९ १० ३६·३	३ ९ ५०·७	१८५१	९ १० २०·५	३ १० २१·७
१८२२	९ १० २२·१	३ ९ ५१·७	१८५२	९ १० ६·२	३ १० २२·७
१८२३	९ १० ७·६	३ ९ ५२·८	१८५३	९ १० ५१·०	३ १० २३·७
१८२४	९ ९ ५३·४	३ ९ ५३·८	१८५४	९ १० ३६·७	३ १० २४·८
१८२५	९ १० ३८·२	३ ९ ५४·९	१८५५	९ १० २२·३	३ १० २५·८
१८२६	९ १० २३ ९	३ ९ ५५·९	१८५६	९ १० ८·०	३ १० २६·८
१८२७	९ १० ९·५	३ ९ ५६·९	१८५७	९ १० ५२·८	३ १० २७·९
१८२८	९ ९ ५५·२	३ ९ ५७·९	१८५८	९ १० ३८.५	३ १० २८·९
१८२९	९ १० ४०·०	३ ९ ५९·०	१८५९	९ १० २४·१	३ १० २९·९

कोष्टक १.

जानुवारी तारीख १ दोनप्रहर, या वेळचे रवीचे व त्याचे उच्चाचे सायनभोग.

इस.सनू	मध्यम सा.सू.	रविउच्च.	इस.सनू	मध्यम सा.सू.	रविउच्च.
	रा० अं० क०	रा० अं० क०		रा० अं० क०	रा० अं० क०
१८६०	९ १० ९·८	३ १० ३०·९	१८८०	९ १० १९·०	३ १० ५१·६
१८६१	९ १० ५४·६	३ १० ३२·०	१८८१	९ ११ ३·८	३ १० ५२·६
१८६२	९ १० ४०·३	३ १० ३३·०	१८८२	९ १० ४९·५	३ १० ५३·६
१८६३	९ १० २६·०	३ १० ३४·१	१८८३	९ १० ३५·१	३ १० ५४·७
१८६४	९ १० ११·७	३ १० ३५·१	१८८४	९ १० २०·८	३ १० ५५·७
१८६५	९ १० ५६·५	३ १० ३६·१	१८८५	९ ११ ५·६	३ १० ५६·८
१८६६	९ १० ४२·२	३ १० ३७·२	१८८६	९ १० ५१·३	३ १० ५७·८
१८६७	९ १० २७·८	३ १० ३८·२	१८८७	९ १० ३६·९	३ १० ५८·८
१८६८	९ १० १३·५	३ १० ३९·२	१८८८	९ १० २२·६	३ १० ५९·९
१८६९	९ १० ५८·३	३ १० ४०·३	१८८९	९ ११ ७·४	३ ११ ०·९
१८७०	९ १० ४४·०	३ १० ४१·३	१८९०	९ १० ५३·१	३ ११ १·९
१८७१	९ १० २९·७	३ १० ४२·३	१८९१	९ १० ३८·८	३ ११ २·९
१८७२	९ १० १५·३	३ १० ४३·३	१८९२	९ १० २४·५	३ ११ ४·०
१८७३	९ ११ ०·१	३ १० ४४·४	१८९३	९ ११ ९·३	३ ११ ५·०
१८७४	९ १० ४५·८	३ १० ४५·४	१८९४	९ १० ५४·९	३ ११ ६·०
१८७५	९ १० ३१·५	३ १० ४६·४	१८९५	९ १० ४०·६	३ ११ ७·१
१८७६	९ १० १७·२	३ १० ४७·५	१८९६	९ १० २६·३	३ ११ ८·१
१८७७	९ ११ २·०	३ १० ४८·५	१८९७	९ ११ ११·१	३ ११ ९·१
१८७८	९ १० ४७·७	३ १० ४९·५	१८९८	९ १० ५६·८	३ ११ १०·२
१८७९	९ १० ३३·३	३ १० ५०·६	१८९९	९ १० ४२·५	३ ११ ११·२
			१९००	९ १० २८·१	३ ११ १२·२

१ ले कोष्टकाची पुरवणी.

१९ वे शतकाचे (ह्मणजे १८०१पासून १९००पर्यंतचे) मागील व पुढील शतकांतील मध्यमरवि व त्याचें उच्च यांची सायनगति.

कालमापनाची	वर्ष संख्या.	सा.मध्य.रविगति.			रविउच्चाची गति		
जुनी चाल.	मागील वर्षे.	रा०	अं०	क०	रा०	अं०	क०
	१०००	०	४	१२·२	११	१२	४८·२
	९००	०	४	५७·९	११	१४	३१·४
	८००	०	५	४३·७	११	१६	१४·६
	७००	०	६	२९·४	११	१७	५७·८
	६००	०	७	१५·२	११	१९	४०·९
	५००	०	८	०·९	११	२१	२४·१
	४००	०	८	४६·७	११	२३	७·३
	३००	०	९	३२·४	११	२४	५०·५
नवी चाल	३००	११	२९	४१·०	११	२४	५०·४
	२००	०	०	२६·८	११	२६	३३·६
	१००	०	०	११.४	११	२८	१६·८
	पुढीलवर्षे.						
	१००	११	२९	४६·६	०	१	४३·२
	२००	०	०	३२·४	०	३	२६·४
	३००	०	०	१९·०	०	५	९·६
	४००	०	०	५·६	०	६	५२·७
	५००	११	२९	५२·२	०	८	३५·९
	६००	०	०	३७·९	०	१०	१९·१
	७००	०	०	२४·६	०	१२	२·३
	८००	०	०	११·२	०	१३	४५·५
	९००	११	२९	५७·८	०	१५	२८·६
	१०००	०	०	४३·५	०	१७	११·८
	११००	०	०	३०·१	०	१८	५५·०
	१२००	०	०	१६·८	०	२०	३८·२
	१३००	०	०	३·४	०	२२	२१·४
	१४००	०	०	४९·१	०	२४	४·६
	१५००	०	०	३५·७	०	२५	४७·८
	१६००	०	०	२२·३	०	२७	३०·९
	१७००	०	०	८·९	०	२९	१४·१
	१८००	०	०	५४·७	१	०	५७·३
	१९००	०	०	४१·३	१	२	४०·५
	२०००	०	०	२७·९	१	४	२३·७
	४०००	०	०	५५·८	२	८	४७·३
	६०००	०	१	२३·८	३	१३	११·०
	८०००	०	१	५१·७	४	१७	३४·७
	१००००	०	२	१९·६	५	२१	५८·३

कोष्टक २.

शके १७०० पासून १८०० पर्यंत प्रतिवर्षी मेषसंक्रांत ज्या दिवशी पडते त्या दिवशी प्रातःकाली रवि व त्याचें उच्च यांची मानें. मध्यरेखा–मुकाम

शा.शक	मध्य.सा.सूर्य.			उच्च.			शा.शक	मध्य.सा.सूर्य.			उच्च.		
	रा०	अं०	क०	रा०	अं०	क०		रा०	अं०	क०	रा०	अं०	क०
१७००	०	१८	२१·०	३	९	६·६	१७३०	०	१८	५·२	३	९	३७·६
१७०१	०	१८	६·७	३	९	७·६	१७३१	०	१८	४९·९	३	९	३८·६
१७०२	०	१७	५२·४	३	९	८·७	१७३२	०	१८	३५·६	३	९	३९·७
१७०३	०	१७	३८·०	३	९	९·७	१७३३	०	१८	२१·३	३	९	४०·७
१७०४	०	१८	२२·८	३	९	१०·७	१७३४	०	१८	७·०	३	९	४१·७
१७०५	०	१८	८·५	३	९	११·८	१७३५	०	१८	५१·७	३	९	४२·७
१७०६	०	१७	५४·२	३	९	१२·८	१७३६	०	१८	३७·४	३	९	४३·८
१७०७	०	१७	३९·८	३	९	१३·८	१७३७	०	१८	२३·१	३	९	४४·८
१७०८	०	१८	२४·६	३	९	१४·९	१७३८	०	१८	८·८	३	९	४५·८
१७०९	०	१८	१०·३	३	९	१५·९	१७३९	०	१८	५३·६	३	९	४६·९
१७१०	०	१७	५६·०	३	९	१६·९	१७४०	०	१८	३९·३	३	९	४७·९
१७११	०	१७	४१·६	३	९	१८·०	१७४१	०	१८	२५·०	३	९	४८·९
१७१२	०	१८	२६·५	३	९	१९·०	१७४२	०	१८	१०·७	३	९	५०·०
१७१३	०	१८	१२·२	३	९	२०·०	१७४३	०	१८	५५·४	३	९	५१·०
१७१४	०	१७	५७·९	३	९	२१·१	१७४४	०	१८	४१·१	३	९	५२·०
१७१५	०	१७	४३·५	३	९	२२·१	१७४५	०	१८	२६·८	३	९	५३·१
१७१६	०	१८	२८·३	३	९	२३·१	१७४६	०	१८	१२·५	३	९	५४·१
१७१७	०	१८	१४·०	३	९	२४·२	१७४७	०	१८	५७·३	३	९	५५·१
१७१८	०	१७	५९·७	३	९	२५·२	१७४८	०	१८	४३·०	३	९	५६·१
१७१९	०	१७	४५·३	३	९	२६·२	१७४९	०	१८	२८·७	३	९	५७·२
१७२०	०	१८	३०·१	३	९	२७·३	१७५०	०	१८	१४·४	३	९	५८·२
१७२१	०	१८	१५·८	३	९	२८·३	१७५१	०	१८	५९·१	३	९	५९·२
१७२२	०	१८	१·५	३	९	२९·३	१७५२	०	१८	४४·८	३	१०	०·३
१७२३	०	१८	४६·३	३	९	३०·४	१७५३	०	१८	३०·५	३	१०	१·३
१७२४	०	१८	३२·०	३	९	३१·४	१७५४	०	१९	१५·२	३	१०	२·३
१७२५	०	१८	१७·७	३	९	३२·४	१७५५	०	१९	०·९	३	१०	३·४
१७२६	०	१८	३·४	३	९	३३·५	१७५६	०	१८	४६·६	३	१०	४·४
१७२७	०	१८	४८·१	३	९	३४·५	१७५७	०	१८	३२·३	३	१०	५·४
१७२८	०	१८	३३·८	३	९	३५·५	१७५८	०	१९	१७·१	३	१०	६·५
१७२९	०	१८	१९·५	३	९	३६·६	१७५९	०	१९	२·७	३	१०	७·५

कोष्टक २.

शा.शक	मध्य.सा.सूर्य.	उच्च.	शा.शक	मध्य.सा.सूर्य.	उच्च.
	रा० अं० क०	रा० अं० क०		रा० अं० क०	रा० अं० क०
१७६०	० १८ ४८·४	३ १० ८·५	१७८०	० १८ ५७·६	३ १० २९·२
१७६१	० १८ ३४·१	३ १० ९·६	१७८१	० १९ ४२·३	३ १० ३०·२
१७६२	० १९ १८·९	३ १० १०·६	१७८२	० १९ २८·०	३ १० ३१·२
१७६३	० १९ ४·६	३ १० ११·६	१७८३	० १९ १३·७	३ १० ३२·३
१७६४	० १८ ५०·३	३ १० १२·७	१७८४	० १८ ५९·४	३ १० ३३·३
१७६५	० १८ ३६·०	३ १० १३·७	१७८५	० १९ ४४·१	३ १० ३४·३
१७६६	० १९ २०.७	३ १० १४·७	१७८६	० १९ २९·८	३ १० ३५·४
१७६७	० १९ ६·४	३ १० १५·७	१७८७	० १९ १५·५	३ १० ३६·४
१७६८	० १८ ५२·१	३ १० १६·८	१७८८	० १९ १·२	३ १० ३७·४
१७६९	० १८ ३७·८	३ १० १७·८	१७८९	० १९ ४६·[illegible]	३ १० ३८·५
१७७०	० १९ २२·६	३ १० १८·८	१७९०	० १९ ३१·७	३ १० ३९·५
१७७१	० १९ ८·३	३ १० १९·९	१७९१	० १९ १७·४	३ १० ४०·५
१७७२	० १८ ५४·०	३ १० २०·९	१७९२	० १९ ३·१	३ १० ४१·६
१७७३	० १८ ३९·७	३ १० २१·९	१७९३	० १९ ४७·८	३ १० ४२·६
१७७४	० १९ २४·४	३ १० २३·०	१७९४	० १९ ३३·५	३ १० ४३·६
१७७५	० १९ १०·१	३ १० २४·०	१७९५	० १९ १९·२	३ १० ४४·७
१७७६	० १८ ५५·८	३ १० २५·०	१७९६	० १९ ४·९	३ १० ४५·७
१७७७	० १८ ४१·५	३ १० २६·१	१७९७	० १९ ४९·६	३ १० ४६·७
१७७८	० १९ २६·२	३ १० २७·१	१७९८	० १९ ३५·३	३ १० ४७·७
१७७९	० १९ ११·९	३ १० २८·१	१७९९	० १९ २१·०	३ १० ४८·८

कोष्टक ३.

रविसाधन.चें साधारण कोष्टक.

सौरमानानें, शून्यशकीं मेषसंक्रांतीचे वेळचे मध्यम रवि आणि रविउच्च यांचे सायनभोग.

क्षेपक.

	रा०	अं०	क०
सायन रवि..	११	२०	४६·१
सा. रविउच्च.	२	९	५२·४

शालि. शक.	मध्य.सा.सूर्य. गति.			रविउच्च. गति.			शालि. शक.	मध्य.सा सूर्य. गति.			रवि उच्च गति.		
	रा०	अं०	क०	रा०	अं०	क०		रा०	अं०	क०	रा०	अं०	क०
१	०	०	१·०	०	०	१·०	१००	०	१	३७·५	०	१	४३·२
२	०	०	२·०	०	०	२·०	२००	०	३	१५·१	०	३	२६·४
३	०	०	२·९	०	०	३·०	३००	०	४	५२·६	०	५	९·६
४	०	०	३·९	०	०	४·१	४००	०	६	३०·२	०	६	५२·७
५	०	०	४·९	०	०	५·१	५००	०	८	७·७	०	८	३५·९
६	०	०	५·९	०	०	६·१	६००	०	९	४५·२	०	१०	१९·१
७	०	०	६·९	०	०	७·२	७००	०	११	२२·८	०	१२	२·३
८	०	०	७·८	०	०	८·२	८००	०	१३	०·३	०	१३	४५·५
९	०	०	८·८	०	०	९·२	९००	०	१४	३७·९	०	१५	२८·७
१०	०	०	९·८	०	०	१०·३	१०००	०	१६	१५·४	०	१७	११·९
२०	०	०	१९·५	०	०	२०·६	२०००	१	२	३०·७	१	४	२३·८
३०	०	०	२९·३	०	०	३०·९	३०००	१	१८	४६·१	१	२१	३५·६
४०	०	०	३९·०	०	०	४१·३	४०००	२	५	१·४	२	८	४७·५
५०	०	०	४८·८	०	०	५१·६	५०००	२	२१	१६·८	२	२५	५९·४
६०	०	०	५८·५	०	१	१·९	६०००	३	७	३२·१	३	१३	११·२
७०	०	१	८·३	०	१	१२·२	७०००	३	२३	४७·५	४	०	२३·१
८०	०	१	१८·०	०	१	२२·५	८०००	४	१०	२·८	४	१७	३५·०
९०	०	१	२७·८	०	१	३२·८	९०००	४	२६	१८·२	५	४	४६·९
१००	०	१	३७·५	०	१	४३·२	१००००	५	१२	३३·५	५	२१	५८·७

कोष्टक ४.

मध्यम रवि व उच्च यांत कालांतरानें पडणारा भेद. हा संस्कार चंद्र मंगळ वगैरे सर्व ग्रहांसही द्यावा लागतो.

शालिवाहन शक.	मध्यमसूर्य यांतील भेद. अं० क०	रविउच्च यांतील भेद. अं० क०
−१०००	+० १४·४	+० २४
९००	० १३·४	० २२
८००	० १२·४	० २०
७००	० ११·४	० १८
६००	० १०·५	० १७
५००	० ९·६	० १५
४००	० ८·७	० १४
३००	० ७·९	० १२
२००	० ७·२	० ११
−१००	० ६·४	० १०
०	० ५·७	० ९
+१००	० ५·१	० ८
२००	० ४·५	० ७
३००	० ३·९	० ६
४००	० ३·३	० ५
५००	० २·८	० ४
६००	० २·४	० ३
७००	० २·०	० ३
८००	० १·६	० २
९००	० १·३	० २
१०००	० १·०	० १
११००	० ०·७	० १
१२००	० ०·५	० १
१३००	० ०·३	० ०
१४००	० ०·१	० ०
१५००	० ०·०	० ०
१६००	० ०·०	० ०
१७००	० ०·०	० ०
१८००	० ०·०	० ०
+१९००	+० ०·१	+० ०

	शालिवाहन शक.	मध्यमसूर्य यांतील भेद. अं० क०	रविउच्च यांतील भेद. अं० क०
	−१००००	+४ ३७	+७ ४६
	९०००	३ ५१	६ २९
	८०००	३ १०	५ २०
शकपूर्व	७०००	२ ३३	४ १७
	६०००	२ ०	३ २१
	५०००	१ ३१	२ ३२
	४०००	१ ५	१ ५०
	३०००	० ४४	१ १४
	२०००	० २७	० ४६
	−१०००	० १५	० २४
	०	० ६	० ९
	+१०००	० १	० १
	२०००	० ०	० ०
	३०००	० ३	० ६
	४०००	० ११	० १९
शकांतर	५०००	० २२	० ३८
	६०००	० ३८	१ ४
	७०००	० ५८	१ ३७
	८०००	१ २१	२ १७
	९०००	१ ४९	३ ३
	+१००००	+२ २१	+३ ५७

कोष्टक ५.

मध्यमसूर्याची दिनगति. सायनमान.

सा. दि.	रवीची गति. रा० अं० क०	सा. दि.	रवीची गति. रा० अं० क०	सा. दि.	रवीची गति. रा० अं० क०
१	० ० ५९·१	३१	१ ० ३३·३	६१	२ ० ७·५
२	० १ ५८·३	३२	१ १ ३२·४	६२	२ १ ६·६
३	० २ ५७·४	३३	१ २ ३१·६	६३	२ २ ५·७
४	० ३ ५६·५	३४	१ ३ ३०.७	६४	२ ३ ४·९
५	० ४ ५५·७	३५	१ ४ २९·९	६५	२ ४ ४·०
६	० ५ ५४·८	३६	१ ५ २९·०	६६	२ ५ ३·१
७	० ६ ५३·९	३७	१ ६ २८·१	६७	२ ६ २·३
८	० ७ ५३·१	३८	१ ७ २७·३	६८	२ ७ १·४
९	० ८ ५२·३	३९	१ ८ २६·४	६९	२ ८ ०·६
१०	० ९ ५१·४	४०	१ ९ २५·५	७०	२ ८ ५९·७
११	० १० ५०·५	४१	१ १० २४·७	७१	२ ९ ५८·८
१२	० ११ ४९·७	४२	१ ११ २३·८	७२	२ १० ५८·०
१३	० १२ ४८·८	४३	१ १२ २३·०	७३	२ ११ ५७·१
१४	० १३ ४७·९	४४	१ १३ २२·१	७४	२ १२ ५६·३
१५	० १४ ४७·१	४५	१ १४ २१·२	७५	२ १३ ५५·४
१६	० १५ ४६·२	४६	१ १५ २०·४	७६	२ १४ ५४·५
१७	० १६ ४५·४	४७	१ १६ १९·५	७७	२ १५ ५३·७
१८	० १७ ४४·५	४८	१ १७ १८·६	७८	२ १६ ५२·८
१९	० १८ ४३·६	४९	१ १८ १७·८	७९	२ १७ ५२·०
२०	० १९ ४२·७	५०	१ १९ १६·९	८०	२ १८ ५१·१
२१	० २० ४१·९	५१	१ २० १६·१	८१	२ १९ ५०·२
२२	० २१ ४१·०	५२	१ २१ १५·२	८२	२ २० ४९·४
२३	० २२ ४०·२	५३	१ २२ १४·४	८३	२ २१ ४८·५
२४	० २३ ३९·३	५४	१ २३ १३·५	८४	२ २२ ४७·६
२५	० २४ ३८·५	५५	१ २४ १२·६	८५	२ २३ ४६·८
२६	० २५ ३७·६	५६	१ २५ ११·८	८६	२ २४ ४५·९
२७	० २६ ३६·७	५७	१ २६ १०·९	८७	२ २५ ४५·१
२८	० २७ ३५·९	५८	१ २७ १०·१	८८	२ २६ ४४·२
२९	० २८ ३५·०	५९	१ २८ ९·२	८९	२ २७ ४३·४
३०	० २९ ३४·१	६०	१ २९ ८·३	९०	२ २८ ४२·५

कोष्टक ५.

मध्यमसूर्याची दिनगति, सायनमान.

सा.दि.	रवि गति.			सा.दि.	रवि गति.			सा.दि.	रवि गति.		
	रा०	अं०	क०		रा०	अं०	क०		रा०	अं०	क०
९१	२	२९	४१·६	१२१	३	२९	१५·८	१५१	४	२८	५०·०
९२	३	०	४०·८	१२२	४	०	१४·९	१५२	४	२९	४९·१
९३	३	१	३९·९	१२३	४	१	१४·१	१५३	५	०	४८·२
९४	३	२	३९·०	१२४	४	२	१३·२	१५४	५	१	४७·४
९५	३	३	३८·२	१२५	४	३	१२·४	१५५	५	२	४६·५
९६	३	४	३७·३	१२६	४	४	११·५	१५६	५	३	४५·६
९७	३	५	३६·५	१२७	४	५	१०·६	१५७	५	४	४४·८
९८	३	६	३५·६	१२८	४	६	९·८	१५८	५	५	४३·९
९९	३	७	३४·७	१२९	४	७	८·९	१५९	५	६	४३·१
१००	३	८	३३·९	१३०	४	८	८·०	१६०	५	७	४२·२
१०१	३	९	३३·०	१३१	४	९	७·२	१६१	५	८	४१·४
१०२	३	१०	३२·१	१३२	४	१०	६·३	१६२	५	९	४०·५
१०३	३	११	३१·३	१३३	४	११	५·४	१६३	५	१०	३९·६
१०४	३	१२	३०·४	१३४	४	१२	४·६	१६४	५	११	३८·८
१०५	३	१३	२९·६	१३५	४	१३	३·७	१६५	५	१२	३७·९
१०६	३	१४	२८·७	१३६	४	१४	२·९	१६६	५	१३	३७·०
१०७	३	१५	२७·९	१३७	४	१५	२·०	१६७	५	१४	३६·२
१०८	३	१६	२७·०	१३८	४	१६	१·१	१६८	५	१५	३५·३
१०९	३	१७	२६·१	१३९	४	१७	०·३	१६९	५	१६	३४·५
११०	३	१८	२५·३	१४०	४	१७	५९·४	१७०	५	१७	३३·६
१११	३	१९	२४·४	१४१	४	१८	५८·६	१७१	५	१८	३२·७
११२	३	२०	२३·५	१४२	४	१९	५७·७	१७२	५	१९	३१·९
११३	३	२१	२२·७	१४३	४	२०	५६·८	१७३	५	२०	३१·१
११४	३	२२	२१·८	१४४	४	२१	५६·०	१७४	५	२१	३०·९
११५	३	२३	२०·९	१४५	४	२२	५५·१	१७५	५	२२	२९·३
११६	३	२४	२०·१	१४६	४	२३	५४·३	१७६	५	२३	२८·४
११७	३	२५	१९·२	१४७	४	२४	५३·४	१७७	५	२४	२७·६
११८	३	२६	१८·४	१४८	४	२५	५२·५	१७८	५	२५	२६·७
११९	३	२७	१७·५	१४९	४	२६	५१·७	१७९	५	२६	२५·८
१२०	३	२८	१६·६	१५०	४	२७	५०·८	१८०	५	२७	२५·०

कोष्टक ५.

मध्यमसूर्याची दिनगति, सायनमान.

सा.दि.	रवि गति. रा०	अं०	क०	सा.दि.	रवि गति. रा०	अं०	क०	सा.दि.	रवि गति. रा०	अं०	क०
१८१	५	२८	२४·१	२११	६	२७	५८·३	२४१	७	२७	३२·५
१८२	५	२९	२३·३	२१२	६	२८	५७·४	२४२	७	२८	३१·६
१८३	६	०	२२·४	२१३	६	२९	५६·६	२४३	७	२९	३०·७
१८४	६	१	२१·५	२१४	७	०	५५·७	२४४	८	०	२९·९
१८५	६	२	२०·७	२१५	७	१	५४·८	२४५	८	१	२९·०
१८६	६	३	१९·८	२१६	७	२	५४·०	२४६	८	२	२८·१
१८७	६	४	१९·०	२१७	७	३	५३·१	२४७	८	३	२७·३
१८८	६	५	१८·१	२१८	७	४	५२·३	२४८	८	४	२६·४
१८९	६	६	१७·२	२१९	७	५	५१·४	२४९	८	५	२५·५
१९०	६	७	१६·४	२२०	७	६	५०·५	२५०	८	६	२४·७
१९१	६	८	१५·५	२२१	७	७	४९·७	२५१	८	७	२३·८
१९२	६	९	१४·६	२२२	७	८	४८·८	२५२	८	८	२३·०
१९३	६	१०	१३·८	२२३	७	९	४७·९	२५३	८	९	२२·१
१९४	६	११	१२·९	२२४	७	१०	४७·१	२५४	८	१०	२१·३
१९५	६	१२	१२·१	२२५	७	११	४६·२	२५५	८	११	२०·४
१९६	६	१३	११·२	२२६	७	१२	४५·४	२५६	८	१२	१९·५
१९७	६	१४	१०·४	२२७	७	१३	४४·५	२५७	८	१३	१८·७
१९८	६	१५	९·५	२२८	७	१४	४३·६	२५८	८	१४	१७·८
१९९	६	१६	८·६	२२९	७	१५	४२·८	२५९	८	१५	१६·९
२००	६	१७	७·७	२३०	७	१६	४१·९	२६०	८	१६	१६·१
२०१	६	१८	६·९	२३१	७	१७	४१·१	२६१	८	१७	१५·२
२०२	६	१९	६·०	२३२	७	१८	४०·२	२६२	८	१८	१४·४
२०३	६	२०	५·२	२३३	७	१९	३९·३	२६३	८	१९	१३·५
२०४	६	२१	४·३	२३४	७	२०	३८·५	२६४	८	२०	१२·६
२०५	६	२२	३·५	२३५	७	२१	३७·६	२६५	८	२१	११·८
२०६	६	२३	२·६	२३६	७	२२	३६·८	२६६	८	२२	१०·९
२०७	६	२४	१·७	२३७	७	२३	३५·९	२६७	८	२३	१०·१
२०८	६	२५	०·९	२३८	७	२४	३५·०	२६८	८	२४	९·२
२०९	६	२६	०·०	२३९	७	२५	३४·२	२६९	८	२५	८·३
२१०	६	२६	५९·१	२४०	७	२६	३३·३	२७०	८	२६	७·५

कोष्टक ५.

मध्यम सूर्याची दिन गति, सायनमान.

सा.दि.	रवि गति.			सा.दि.	रवि गति.			सा.दि.	रवि गति.		
	रा०	अं०	क०		रा०	अं०	क०		रा०	अं०	क०
२७१	८	२७	६·६	३०३	९	२८	३९·१	३३५	११	०	११·५
२७२	८	२८	५·८	३०४	९	२९	३८·२	३३६	११	१	१०·६
२७३	८	२९	४·९	३०५	१०	०	३७·३	३३७	११	२	९·८
२७४	९	०	४·०	३०६	१०	१	३६·५	३३८	११	३	८·९
२७५	९	१	३·२	३०७	१०	२	३५·६	३३९	११	४	८·१
२७६	९	२	२·३	३०८	१०	३	३४·८	३४०	११	५	७·२
२७७	९	३	१·५	३०९	१०	४	३३·९	३४१	११	६	६·३
२७८	९	४	०·६	३१०	१०	५	३३·०	३४२	११	७	५·५
२७९	९	४	५९·७	३११	१०	६	३२·२	३४३	११	८	४·६
२८०	९	५	५८·९	३१२	१०	७	३१·३	३४४	११	९	३·८
२८१	९	६	५८·०	३१३	१०	८	३०·४	३४५	११	१०	२·९
२८२	९	७	५७·१	३१४	१०	९	२९·६	३४६	११	११	२·०
२८३	९	८	५६·३	३१५	१०	१०	२८·७	३४७	११	१२	१·२
२८४	९	९	५५·४	३१६	१०	११	२७·९	३४८	११	१३	०·३
२८५	९	१०	५४·६	३१७	१०	१२	२७·०	३४९	११	१३	५९·५
२८६	९	११	५३·७	३१८	१०	१३	२६·१	३५०	११	१४	५८·६
२८७	९	१२	५२·८	३१९	१०	१४	२५·३	३५१	११	१५	५७·७
२८८	९	१३	५२·०	३२०	१०	१५	२४·४	३५२	११	१६	५६·९
२८९	९	१४	५१·१	३२१	१०	१६	२३·६	३५३	११	१७	५६·०
२९०	९	१५	५०·३	३२२	१०	१७	२२·७	३५४	११	१८	५५·१
२९१	९	१६	४९·४	३२३	१०	१८	२१·८	३५५	११	१९	५४·३
२९२	९	१७	४८·५	३२४	१०	१९	२१·०	३५६	११	२०	५३·४
२९३	९	१८	४७·७	३२५	१०	२०	२०·१	३५७	११	२१	५२·५
२९४	९	१९	४६·८	३२६	१०	२१	१९·३	३५८	११	२२	५१·७
२९५	९	२०	४५·९	३२७	१०	२२	१८·४	३५९	११	२३	५०·८
२९६	९	२१	४५·१	३२८	१०	२३	१७·५	३६०	११	२४	५०·०
२९७	९	२२	४४·२	३२९	१०	२४	१६·७	३६१	११	२५	४९·१
२९८	९	२३	४३·४	३३०	१०	२५	१५·८	३६२	११	२६	४८·३
२९९	९	२४	४२·५	३३१	१०	२६	१४·९	३६३	११	२७	४७·४
३००	९	२५	४१·६	३३२	१०	२७	१४·१	३६४	११	२८	४६·५
३०१	९	२६	४०·८	३३३	१०	२८	१३·२	३६५	११	२९	४५·७
३०२	९	२७	३९·९	३३४	१०	२९	१२·४	३६६	१२	०	४४·८

कोष्टक ६.

मध्यमसूर्याची घटीगति, सायनमान.

घटि.	रविगति.			घटि.	रविगति.			घटि.	रविगति.		
	रा०	अं०	क०		रा०	अं०	क०		रा०	अं०	क०
१	०	०	१·०	२१	०	०	२०·७	४१	०	०	४०·४
२			२·०	२२			२१·७	४२			४१·४
३			३·०	२३			२२·७	४३			४२·४
४			४·०	२४			२३·७	४४			४३·४
५			५·०	२५			२४·७	४५			४४·४
६			६·०	२६			२५·७	४६			४५·४
७			६·९	२७			२६·६	४७			४६·३
८			७·९	२८			२७·६	४८			४७·३
९			८·९	२९			२८·६	४९			४८·३
१०			९·९	३०			२९·६	५०			४९·३
११			१०·९	३१			३०·६	५१			५०·३
१२			११·९	३२			३१·६	५२			५१·२
१३			१२·९	३३			३२·६	५३			५२·२
१४			१३·८	३४			३३·५	५४			५३·२
१५			१४·८	३५			३४·५	५५			५४·२
१६			१५·८	३६			३५·५	५६			५५·२
१७			१६·८	३७			३६·५	५७			५६·१
१८			१७·८	३८			३७·५	५८			५७·१
१९			१८·८	३९			३८·५	५९			५८·१
२०	०	०	१९·८	४०	०	०	३९·५	६०	०	०	५९·१

कोष्टक ७.

मध्यमसूर्यास फलसंस्कार शके १७३२

उपकरण = रविकेंद्र.

मध्य. केंद्र. अंश.	० रा. − अं० क०		१ रा. − अं० क०		२ रा. − अं० क०		३ रा. − अं० क०		४ रा. − अं० क०		५ रा. − अं० क०		मध्य. केंद्र. अंश
०	०	०.०	०	५६.७	१	३८.९	१	५५.४	१	४१.०	०	५८.८	३०
१	०	२.०	०	५८.४	१	३९.९	१	५५.४	१	४०.०	०	५७.०	२९
२	०	३.९	१	०.१	१	४०.९	१	५५.४	१	३९.०	०	५५.२	२८
३	०	५.९	१	१.८	१	४१.९	१	५५.४	१	३७.९	०	५३.४	२७
४	०	७.९	१	३.४	१	४२.८	१	५५.३	१	३६.८	०	५१.६	२६
५	०	९.८	१	५.१	१	४३.७	१	५५.२	१	३५.७	०	४९.७	२५
६	०	११.८	१	६.७	१	४४.५	१	५५.०	१	३४.६	०	४७.९	२४
७	०	१३.८	१	८.३	१	४५.४	१	५४.८	१	३३.४	०	४६.०	२३
८	०	१५.७	१	९.९	१	४६.२	१	५४.६	१	३२.१	०	४४.१	२२
९	०	१७.७	१	११.५	१	४७.०	१	५४.४	१	३०.९	०	४२.२	२१
१०	०	१९.६	१	१३.०	१	४७.७	१	५४.१	१	२९.६	०	४०.३	२०
११	०	२१.६	१	१४.५	१	४८.४	१	५३.८	१	२८.३	०	३८.३	१९
१२	०	२३.५	१	१६.०	१	४९.०	१	५३.४	१	२७.०	०	३६.४	१८
१३	०	२५.४	१	१७.५	१	४९.७	१	५३.०	१	२५.६	०	३४.४	१७
१४	०	२७.४	१	१९.०	१	५०.३	१	५२.६	१	२४.२	०	३२.५	१६
१५	०	२९.३	१	२०.४	१	५०.८	१	५२.१	१	२२.८	०	३०.५	१५
१६	०	३१.२	१	२१.९	१	५१.४	१	५१.६	१	२१.४	०	२८.५	१४
१७	०	३३.१	१	२३.२	१	५१.९	१	५१.०	१	१९.९	०	२६.५	१३
१८	०	३५.०	१	२४.६	१	५२.४	१	५०.५	१	१८.५	०	२४.५	१२
१९	०	३६.९	१	२५.९	१	५२.८	१	४९.९	१	१७.०	०	२२.५	११
२०	०	३८.७	१	२७.२	१	५३.२	१	४९.२	१	१५.४	०	२०.५	१०
२१	०	४०.६	१	२८.५	१	५३.६	१	४८.६	१	१३.८	०	१८.४	९
२२	०	४२.४	१	२९.८	१	५४.०	१	४७.९	१	१२.२	०	१६.४	८
२३	०	४४.२	१	३१.०	१	५४.३	१	४७.१	१	१०.६	०	१४.४	७
२४	०	४६.१	१	३२.२	१	५४.५	१	४६.३	१	९.०	०	१२.३	६
२५	०	४७.९	१	३३.४	१	५४.८	१	४५.५	१	७.४	०	१०.३	५
२६	०	४९.७	१	३४.६	१	५५.०	१	४४.७	१	५.७	०	८.२	४
२७	०	५१.४	१	३५.७	१	५५.१	१	४३.८	१	४.०	०	६.१	३
२८	०	५३.२	१	३६.८	१	५५.३	१	४२.९	१	२.३	०	४.१	२
२९	०	५५.०	१	३७.९	१	५५.४	१	४२.०	१	०.५	०	२.०	१
३०	०	५६.७	१	३८.९	१	५५.४	१	४१.०	०	५८.८	०	०.०	०
मध्य. कें. अं	११ रा. +		१० रा. +		९ रा. +		८ रा. +		७ रा. +		६ रा. +		मध्य. कें. अं

(Spanning header over the six रा. columns: रवि मध्यम केंद्राच्या राशी.)

कोष्टक ८.

सूर्याचा चलकर्ण, स्पष्ट दिनगति, आणि बिंब.

उपकरण = रविमध्यम केंद्र.

रवि म. केंद्र.	चलकर्ण	स्पष्ट गति.	बिंब.	रवि म. केंद्र.
रा० अं०		रा० अं०	रा० अं०	रा० अं०
६ ०	०·९८३२१	१ १·१	० ३२·६	६ ०
६ १०	०·९८३४७	१ १·१	० ३२·६	५ ४०
६ २०	०·९८४२६	१ १·०	० ३२·५	५ २०
७ ०	०·९८५५३	१ ०·९	० ३२·५	५ ०
७ १०	०·९८७२६	१ ०·७	० ३२·४	४ ४०
७ २०	०·९८९३८	१ ०·४	० ३२·४	४ २०
८ ०	०·९९१८२	१ ०·१	० ३२·३	४ ०
८ १०	०·९९४५१	० ५९·७	० ३२·२	३ ४०
८ २०	०·९९७३६	० ५९·४	० ३२·१	३ २०
९ ०	१·०००२८	० ५९·१	० ३२·०	३ ०
९ १०	१·००३१८	० ५८·७	० ३१·९	२ ४०
९ २०	१·००५९९	० ५८·४	० ३१·८	२ २०
१० ०	१·००८६०	० ५८·१	० ३१·८	२ ०
१० १०	१·०१०९६	० ५७·८	० ३१·७	१ ४०
१० २०	१·०१२९८	० ५७·६	० ३१·६	१ २०
११ ०	१·०१४६१	० ५७·४	० ३१·६	१ ०
११ १०	१·०१५८१	० ५७·३	० ३१·५	० ४०
११ २०	१·०१६५४	० ५७·२	० ३१·५	० २०
० ०	१·०१६७९	० ५७·१	० ३१·५	० ०

कोष्टक ९.

शकापूर्वी आणि शकानंतर विषुववृत्ताशीं क्रांतिवृत्ताचें तिर्यक्त्व.

शकाचे शेंकडे	तिर्यक् अं०	क०		सौर वर्षें	तिर्यक् अं०	क०
७००	२३	३७	शकापूर्वी.	१००००	२४	५६
८००	२३	३६		९०००	२४	४९
९००	२३	३५		८०००	२४	४२
१०००	२३	३४		७०००	२४	३५
११००	२३	३३		६०००	२४	२८
१२००	२३	३२		५०००	२४	२०
१३००	२३	३२		४०००	२४	१३
१४००	२३	३१		३०००	२४	५
१५००	२३	३०		२०००	२३	५७
१६००	२३	२९		१०००	२३	५०
१७००	२३	२८		०	२३	४२
१८००	२३	२७	शकानंतर.	१०००	२३	३४
१९००	२३	२६		२०००	२३	२६
२०००	२३	२६		३०००	२३	१८
२१००	२३	२५		४०००	२३	९
२२००	२३	२४		५०००	२३	१
२३००	२३	२३		६०००	२२	५३
२४००	२३	२२		७०००	२२	४४
२५००	२३	२१		८०००	२२	३६
२६००	२३	२०		९०००	२२	२७
२७००	२३	२०		१००००	२२	१८

कोष्टक १०.

सूर्याची स्पष्टक्रांति.

उपकरण= सायन स्पष्टरवि.

अंश.	० रा. उ. क्रां.	१ रा. उ. क्रां.	२ रा. उ. क्रां.	३ रा. उ. क्रां.	४ रा. उ. क्रां.	५ रा. उ. क्रां.	अंश.
	अं० क०	अं० क०	अं० क०	अं० क०	अं० क०	अं० क०	
०	० ०	११ २९	२० ११	२३ २८	२० ११	११ २९	३०
१	० २४	११ ५०	२० २३	२३ २८	१९ ५८	११ ८	२९
२	० ४८	१२ ११	२० ३५	२३ २७	१९ ४४	१० ४७	२८
३	१ १२	१२ ३२	२० ४७	२३ २६	१९ ३१	१० २५	२७
४	१ ३६	१२ ५२	२० ५९	२३ २५	१९ १७	१० ३	२६
५	१ ५९	१३ १२	२१ १०	२३ २३	१९ ३	९ ४१	२५
६	२ २३	१३ ३२	२१ २०	२३ २०	१८ ४८	९ १९	२४
७	२ ४७	१३ ५२	२१ ३०	२३ १७	१८ ३३	८ ५७	२३
८	३ ११	१४ १२	२१ ४०	२३ १४	१८ १८	८ ३५	२२
९	३ ३४	१४ ३१	२१ ५०	२३ १०	१८ २	८ १२	२१
१०	३ ५८	१४ ५०	२१ ५९	२३ ६	१७ ४६	७ ५०	२०
११	४ २२	१५ ९	२२ ७	२३ १	१७ ३०	७ २७	१९
१२	४ ४५	१५ २७	२२ १६	२२ ५६	१७ १३	७ ४	१८
१३	५ ८	१५ ४६	२२ २३	२२ ५०	१६ ५६	६ ४१	१७
१४	५ ३२	१६ ४	२२ ३०	२२ ४४	१६ २९	६ १८	१६
१५	५ ५५	१६ २१	२२ ३७	२२ ३७	१६ २१	५ ५५	१५
१६	६ १८	१६ २९	२२ ४४	२२ ३०	१६ ४	५ ३२	१४
१७	६ ४१	१६ ५६	२२ ५०	२२ २३	१५ ४६	५ ८	१३
१८	७ ४	१७ १३	२२ ५६	२२ १६	१५ २७	४ ४५	१२
१९	७ २७	१७ ३०	२३ १	२२ ७	१५ ९	४ २२	११
२०	७ ५०	१७ ४६	२३ ६	२१ ५९	१४ ५०	३ ५८	१०
२१	८ १२	१८ २	२३ १०	२१ ५०	१४ ३१	३ ३४	९
२२	८ ३५	१८ १८	२३ १४	२१ ४०	१४ १२	३ ११	८
२३	८ ५७	१८ ३३	२३ १७	२१ ३०	१३ ५२	२ ४७	७
२४	९ १९	१८ ४८	२३ २०	२१ २०	१३ ३२	२ २३	६
२५	९ ४१	१९ ३	२३ २३	२१ १०	१३ १२	१ ५९	५
२६	१० ३	१९ १७	२३ २५	२० ५९	१२ ५२	१ ३६	४
२७	१० २५	१९ ३१	२३ २६	२० ४७	१२ ३२	१ १२	३
२८	१० ४७	१९ ४४	२३ २७	२० ३५	१२ ११	० ४८	२
२९	११ ८	१९ ५८	२३ २८	२० २३	११ ५०	० २४	१
३०	११ २९	२० ११	२३ २८	२० ११	११ २९	० ०	०
अंश.	११ रा. द. क्रां.	१० रा. द. क्रां.	९ रा. द. क्रां.	८ रा. द. क्रां.	७ रा. द. क्रां.	६ रा. द. क्रां.	अंश.

कोष्टक ११.

सायन स्पष्ट सूर्यापासून सूर्याचे विषुवांश काढण्याकरितां संस्कार.

उपकरण=सायन स्पष्टरवि.

अंश.	० रा. −	१ रा. −	२ रा. −	३ रा. +	४ रा. +	५ रा. +	अंश.
	अं० क०	अं० क०	अं० क०	अं० क०	अं० क०	अं० क०	
०	० ०	२ ६	२ ११	० ०	२ ११	२ ६	३०
१	० ५	२ ८	२ ८	० ५	२ १४	२ ३	२९
२	० १०	२ ११	२ ५	० ११	२ १६	२ ०	२८
३	० १५	२ १३	२ ३	० १६	२ १८	१ ५७	२७
४	० २०	२ १५	२ ०	० २२	२ २०	१ ५४	२६
५	० २५	२ १७	१ ५७	० २७	२ २१	१ ५०	२५
६	० ३०	२ १९	१ ५३	० ३२	२ २३	१ ४७	२४
७	० ३४	२ २१	१ ५०	० ३७	२ २४	१ ४३	२३
८	० ३९	२ २२	१ ४६	० ४३	२ २५	१ ४०	२२
९	० ४४	२ २३	१ ४२	० ४८	२ २६	१ ३६	२१
१०	० ४९	२ २५	१ ३८	० ५३	२ २७	१ ३२	२०
११	० ५३	२ २६	१ ३४	० ५८	२ २८	१ २८	१९
१२	० ५८	२ २७	१ ३०	१ ३	२ २८	१ २४	१८
१३	१ ३	२ २७	१ २६	१ ८	२ २८	१ २०	१७
१४	१ ७	२ २८	१ २२	१ १२	२ २८	१ १६	१६
१५	१ ११	२ २८	१ १७	१ १७	२ २८	१ ११	१५
१६	१ १६	२ २८	१ १२	१ २२	२ २८	१ ७	१४
१७	१ २०	२ २८	१ ८	१ २६	२ २७	१ ३	१३
१८	१ २४	२ २८	१ ३	१ ३०	२ २७	० ५८	१२
१९	१ २८	२ २८	० ५८	१ ३४	२ २६	० ५३	११
२०	१ ३२	२ २७	० ५३	१ ३८	२ २५	० ४९	१०
२१	१ ३६	२ २६	० ४८	१ ४२	२ २३	० ४४	९
२२	१ ४०	२ २५	० ४३	१ ४६	२ २२	० ३९	८
२३	१ ४३	२ २४	० ३७	१ ५०	२ २१	० ३४	७
२४	१ ४७	२ २३	० ३२	१ ५३	२ १९	० ३०	६
२५	१ ५०	२ २१	० २७	१ ५७	२ १७	० २५	५
२६	१ ५४	२ २०	० २२	२ ०	२ १५	० २०	४
२७	१ ५७	२ १८	० १६	२ ३	२ १३	० १५	३
२८	२ ०	२ १६	० ११	२ ५	२ ११	० १०	२
२९	२ ३	२ १४	० ५	२ ८	२ ८	० ५	१
३०	२ ६	२ ११	० ०	२ ११	२ ६	० ०	०
अंश.	११ रा. +	१० रा. +	९ रा. +	८ रा. −	७ रा. −	६ रा. −	अंश.

कोष्टक १२.

मध्यम व स्पष्ट या कालांतील भेद.

शके १७०० पासून १९०० पर्यंत.

उपकरण = सायन मध्यम सूर्य.

स्पष्ट कालास हा संस्कार केला म्हणजे मध्यम काल येतो.

अं	रा. ०	रा. १	रा. २	रा. ३	रा. ४	रा. ५	रा. ६	रा. ७	रा. ८	रा. ९	रा. १०	रा. ११	अं
	प.	प.	प.	प.	प.	प.	प.	प.	प.	प.	प.	प.	
०	१८	४	९	३	१५	७	१७	३८	३५	४	२९	३५	०
१	१७	४	९	४	१५	६	१८	३९	३४	३	३०	३५	१
२	१६	५	९	४	१५	६	१९	३९	३३	२	३१	३५	२
३	१५	५	९	५	१५	५	२०	३९	३३	०	३१	३४	३
४	१४	६	८	५	१५	४	२०	३९	३२	२	३२	३४	४
५	१३	६	८	६	१५	४	२१	४०	३१	३	३३	३३	५
६	१२	७	८	६	१५	३	२२	४०	३०	४	३३	३३	६
७	१२	७	८	७	१५	२	२३	४०	२९	६	३३	३२	७
८	११	७	७	८	१५	१	२४	४०	२९	७	३४	३२	८
९	१०	८	७	८	१५	०	२५	४०	२८	८	३४	३१	९
१०	१०	८	७	९	१५	१	२६	४०	२७	९	३४	३१	१०
११	९	८	६	९	१५	२	२७	४१	२६	१०	३५	३०	११
१२	८	९	६	१०	१४	२	२८	४१	२५	११	३५	३०	१२
१३	७	९	५	१०	१४	३	२८	४१	२४	१२	३५	२९	१३
१४	६	९	५	१०	१४	४	२९	४०	२३	१३	३६	२९	१४
१५	६	९	४	११	१४	५	३०	४०	२२	१५	३६	२८	१५
१६	५	९	४	११	१३	५	३१	४०	२१	१६	३६	२७	१६
१७	४	९	३	१२	१३	६	३१	४०	२०	१७	३६	२७	१७
१८	३	१०	३	१२	१३	७	३२	४०	१९	१८	३६	२६	१८
१९	३	१०	२	१२	१२	८	३२	४०	१८	१९	३६	२६	१९
२०	२	१०	२	१३	१२	९	३३	४०	१६	२०	३७	२५	२०
२१	२	१०	२	१३	११	१०	३४	३९	१५	२१	३७	२४	२१
२२	१	१०	१	१३	११	१०	३४	३९	१४	२२	३७	२४	२२
२३	०	१०	१	१४	११	११	३५	३९	१३	२३	३७	२३	२३
२४	०	१०	०	१४	१०	१२	३५	३८	१२	२४	३७	२२	२४
२५	१	१०	०	१४	१०	१३	३६	३८	१०	२५	३६	२२	२५
२६	१	१०	१	१४	९	१४	३६	३७	९	२६	३६	२१	२६
२७	२	१०	२	१५	८	१५	३७	३७	८	२७	३६	२१	२७
२८	२	९	२	१५	८	१५	३७	३६	७	२७	३६	२०	२८
२९	३	९	३	१५	७	१६	३८	३५	६	२८	३६	१९	२९
३०	४	९	३	१५	७	१७	३८	३५	४	२९	३५	१८	३०
	+		−			+				−			
	−	−	+	+	+	−	−	−	−	+	+	+	

कोष्टक १३.

मागें ६ वे कोष्टकांत सूर्यास मंदफलसंस्कार देतांना परम फळ १ अं. ५५ क. धरलें आहे. परंतु इतर ग्रहांचे आकर्षणामुळें हें सर्वदा सारखें असत नाहीं ह्मणून शालिवाहना पूर्वी १०००० पासून शालिवाहना नंतर १०००० वर्षेपर्यंत हें फल दर दर हजारावे वर्षी किती किती होतें तें खालीं दाखविलें आहे.

शालिवाहना पूर्वींचीं वर्षे	परमफळ.	शालिवाहना नंतरचीं वर्षे	परमफळ.
	अं० क०		अं० क०
१००००	२ ३१	०	२ १
९०००	२ २८	१०००	१ ५८
८०००	२ २५	२०००	१ ५५
७०००	२ २२	३०००	१ ५२
६०००	२ १९	४०००	१ ४९
५०००	२ १६	५०००	१ ४६
४०००	२ १३	६०००	१ ४३
३०००	२ १०	७०००	१ ४०
२०००	२ ७	८०००	१ ३७
१०००	२ ४	९०००	१ ३४
०	२ १	१००००	१ ३१

या कोष्टकावरून आपणास असें समजलें कीं दिवसानुदिवस रविफलसंस्कार कमी कमी होत चालला आहे.

चंद्रसाधन.

व्याख्यान.

पारिसशहरामध्यें बोर्ड आफ लांजिट्युड या नावानें एक विख्यात मंडळी आहे. या मंडळींत ज्योतिःशास्त्रसंबंधीं सर्व विषयांचा विचार करीत असतात. याणीं (सुमारें शंभर वर्षांपूर्वीं) असें फर्माविलें होतें कीं जो गृहस्थ चंद्र साधनांचीं शुद्ध कोष्टकें तयार करील त्यास मोठें बक्षीस मिळेल. त्यावरून मांशियर बर्ग याणें तीं कोष्टकें तयार करून देऊन हें बक्षिस मिळविलें त्यांचाच उतारा आह्मीं एथे केला आहे असें ह्मणण्यास चिंता नाहीं. इतकेंच कीं आह्मी ग्रंथविस्तार भयास्तव त्यांतील हलके हलके संस्कारांची बहुतेक कोष्टकें सोडून दिलीं आहेत.

हीं कोष्टकें तयार करतेवेळेस त्याणें ग्रिनिचचे वेधशाळेंतील इसवी सन् १७६५ पासून १७९३ पर्यंत सुमारें तीन हजार चंद्रावर वेध केले होते, त्यांचा उपयोग केला.

यावरून त्याणें सन १७७९ इ० या वर्षीचे चंद्राचे क्षेपकांक फार उत्कृष्ट रितीने काढले आहेत. त्यांचा उतारा खालीं घेतला आहे.

पारिस शहरचे दोन प्रहर.

दिसेंबर तारीख ३१. सन १७७८.

	रा०	अं०	क०	वि०
मध्यमचंद्र. सायन	२	१२	४०	४०.४
चंद्र मध्यमकेंद्र	११	११	४४	५७.३
चक्र शुद्ध राहु सायन	९	१०	३४	११.२

यांतील मध्यम चंद्र ३२०० वेधांपासून तयार केला आहे चंद्र मध्यमकेंद्र १३०० वेधांपासून तयार केलें आहे. आणि चक्र शुद्ध राहू १५२९ वेधांपासून तयार केला आहे.

या गणितकारानें फ्रान्स देशांतील दुसरे पंडितांचे सहाय्यानें, पुष्कळ वेधांवरून, मोठे श्रम घेऊन चंद्र साधनार्थ उत्कृष्ट रितीचीं कोष्टकें तयार केलीं.

हिंदुलोकांत इसवी सन चालत नाहीं ह्मणून चंद्राचे अंश वगैरे त्या शकांतून काढून शालिवाहन शकास लागू पडत अशी आह्मी तजवीज केली आहे.

मध्यम चंद्रास स्पष्ट करण्याकरितां वास्तविक पाहूं गेलें असतां ४० संस्कारांवर संस्कार करावे लागतात. परंतु सध्या आह्मास एका कळेपेक्षां अधिक सूक्ष्मतेची गरज नाहीं असें मानून त्यांपैकीं मोठमोठालें पांच संस्कार मात्र आह्मी आपल्या कोष्टकांत दिले आहेत.

या पुढें अधिक सुक्ष्मतेची अवश्यकता लागली तर ईश्वर कोणासही सर्वही संस्कारांची कोष्टकें तयार करण्यास स्फुर्ति देईल.

हिंदु गणितकार मध्यमचंद्रांस फलसंस्कार एवढा एक मात्र संस्कार करितात. यामुळें गणितानें आलेले चंद्रांत कधीं कधीं २ अंश पर्यंत चुकी पडत्ये. आह्मी पांच संस्कार हिशेबांत घेतले आहेत यामुळें गणितात चंद्र साधारणपणाने एका कळेचे आंत चुकीनें असेल, परंतु एकादे वेळेस आमचे रितिनें केलेला चंद्रही ५ कळां पर्यंत चुकेल. सध्या इतकेंच ह्मणावयाचे कीं हिंदु गणितकारांचें गणित दोन अंशपर्यंत चुकतें, आमचे कोष्टकाचे योगानें दोन कळापर्यंत आलें तरी बरेंच साधलें.

मनशियर बर्ग याचा कोष्टकांपासून जे क्षेपकांक आमचे

कोष्टकांकरितां शालिवाहन शकाचे संबंधानें तयार केले आहेत ते खालीं दिले आहेत.

क्षेपकांक..शके १८०० हिंदी मेषसंक्रांतीची वेळ.

	रा०	अं०	क०	वि०
सायनमध्यमचंद्र....	४	१५	१२	११·८
चंद्रमध्यमकेंद्र......	४	२४	४१	४८·५
चक्र शुद्ध राहू......	१	१०	४५	२९·६

एका सौरवर्षातीं गति,

	रा०	अं०	क०	वि०
मध्यमचंद्र........	४	१३	४७	३८·९९६७
चंद्रमध्यमकेंद्र......	३	२	६	९·४३०२
चक्र शुद्ध राहू......	०	१९	२०	३२·६८९१

दिन गति.	रा०	अं०	क०	वि०
मध्यमचंद्र........	०	१३	१०	३५·०२७
चंद्रमध्यमकेंद्र.......	०	१३	३	५३·९७०
चक्र शुद्ध राहू......	०	०	३	१०·६३९

चंद्राची मध्यम गति सर्वदां सारखी नाहीं यास्तव, या मध्यम गतीवरून चंद्र आणल्यावर त्यांत जो बहुत कालांतरानें भेद पडतो तो खालचे सारणींवरून काढतां येतो.

$$व = \frac{इष्ट शक - १६२२}{१००}$$

मध्यम चंद्रास, कालांतराचा संस्कार

वि० वि०

+ १०·१८१६२१२६८ व² + ०·०१८५३८४४०८ व³.

मध्यम केंद्रास कालांतराचा संस्कार.

+ ४·०००५२ × चंद्राचा कालांतराचा संस्कार.

चक्र शुद्ध राहूस कालांतराचा संस्कार.

– ०·७३५४५२. X चंद्राचा कालांतराचा संस्कार.

याप्रमाणें कालांतराचा संस्कार करून जो चंद्र आलेला असतो, त्यास जे पांच संस्कार करावयाचे ते खालीं दिले आहेत.

सारण्यांत पुढील चिन्हें योजिलीं आहेत.

☉ = स्पष्ट रवि स = रविचें मध्यमकेंद्र.

☾ = मध्यम चंद्र क = चंद्राचें मध्यमकेंद्र.

☊ = चक्र शुद्ध राहू.

सूर्या सभोंवतीं पृथ्वी दीर्घ वर्तुळांत फिरती यामुळें सूर्यापासून तिचे अंतर सर्वदां सारखें नसतें, ह्मणून चंद्रावर सूर्याचें अनियमीत आकर्षण पडून त्याचे गतींत भेद पडतो. हा भेद खालीं दाखविला आहे.

मध्यम चंद्रांत	भेद.	११·२ भु.स.
चंद्र केंद्रांत	भेद.	२२·३ भु.स.
चक्रशुद्ध राहूंत	भेद.	९·० भु.स.

पृथ्वी सभोंवतीं चंद्रही दीर्घ वर्तुळांत फिरतो यामुळें फळ संस्कार उत्पन्न होतो.

		अं०	क०	
फल संस्कार=	–	६	··१८·२	भु.क.
	+		१२·९	भु.२क.
	–		०·६	भु.३क.

परंतु चंद्रावरही सूर्याचें आकर्षण आहे त्यामुळें त्याचे कक्षेंची आकृतीही सूर्य बदलतो. यामुळें वरील फल संस्कारांतहीं अंतर पडतें. हा भेद चंद्रकेंद्र आणि सूर्याची स्थिती याप्रमाणें वेगळाला होतो. या संस्कारास इंग्रजींत इवेक्शन् (ह्म० च्युत संस्कार) असें ह्मणतात. जर

उ = २ (☾-☉) – क घेतला

तर.

                    अं० क०   क०

इवेक्शंनू = –१..२०.५ भु. उ + ०.६ भु. २ उ. आहे.

वर सांगितलेले तीन संस्कारांनीं चंद्र स्पष्ट होत नाहीं. ज्या बाजूस सूर्य असेल त्या बाजूस तो चंद्रास आपणाकडे ओढून घेतो. यास इंग्रजींत वेरियेशंन (ह्म० तिथींसंबंधानें संस्कार) असें ह्मणतात.

                    क०   क०

वेरियेशंन = –२.० भु (☾-☉) + ३५.७ भु२ (☾-☉)

हा संस्कार दिला ह्मणजे चंद्र आपले विक्षेप वृत्तावर स्पष्ट होतो; परंतु भोग क्रांतिवरचे आणावे लागतात, ह्मणून

                                   क०

कक्षा संबंधानें संस्कार = –६.८ भु (☾+☊)

याप्रमाणें चंद्रास जेव्हां पांच संस्कार करावे तेव्हां क्रांति वृत्त संबंधानें चंद्र स्पष्ट होतो.

चंद्राचे कक्षेचें क्रांतिवृत्ताशीं तिर्यक्त्व. ५अं० ८.८क० इतकें आहे, परंतु सूर्याचे आकर्षणामुळें तें कधीं ५अं० ०क० होतें व कधीं ५ अं० १७.६ क० होतें.

चंद्र जसा लांब असेल त्याप्रमाणें, त्याची दिनगति, लंबन आणि बिंब हीं लाहान असतात.

	बिंब.	लंबन.
जेव्हां चंद्राची दिनगति ७००कला आहे तेव्हां	२९.४	५३.९
” ७९०............	३१.२	५७.२
” ८८०............	३३.०	६०.५

चंद्र ग्रहणांत भूभा काढावी लागत्ये. साधारणपणानें सांप्रत आह्मास जेवढी सुक्ष्मता पाहिजे तिजकडे लक्ष दिलें तर भूभा

काढतांना रवि बिंब सर्वदां ३१·७क० धरल्यास चिंता नाहीं.

भूभा = २ चंद्र लंबन – ३१·७

चंद्र ग्रहणांत भूभेची कडण २ कलांपर्यंत भूकंट असल्ये, त्यामुळें चंद्र ग्रहणाचा आरंभ व मोक्ष हीं स्पष्ट रीतीनें कधींही पाहातां येत नाहीं.

कोष्टकांवरून गणित करण्याचें.

इसवी सन दिला असला आणि तो जर १८००–१९०० मध्यें असला तर १ले कोष्टकावरून जानुवारीचे ०तारिखेचा दिलेल्या वर्षीचा सायनमध्यमचंद्र काढतां येईल. नाहीं तर पुरवणिचीं कोष्टकें दिलीं आहेत त्यांचे अधारानें काढतां येईल.

उदाहरण. सन २०३३ सांतला चंद्र हवा लागल्यास

		रा०	अं०	क०
को० १लें. मध्यमचंद्र. सन्	१८३२	८	१८	४६·५
पुरवणी. गति.	२००	८	२	३४·९
मध्यमचंद्र.	२०३२	४	२०	२१·४

२ रे कोष्टकांत शके १७०० पासून १८०० पर्यंत, प्रतिवर्षीचे मेष संक्रांतीचे दिवशींचे प्रात:काळचा, मध्यमचंद्र वगैरे दिला आहे.

३ रे कोष्टकावरून पाहिजे त्या वर्षीचा चंद्र काढतां येतो. उदाहरण, शके १६१५ वे वर्षीचा मेष संक्रांतीचे वेळचा मध्यमचंद्र वगैरे काय येईल तें सांग ?

	रा०	अं०	क०
क्षेपकांक……………	४	२५	४२·४
वर्षें १००० ……………	१०	१४	९·९
६०० ……………	३	२६	२९·९
१० ……………	८	७	५६·५
५ ……………	१०	३	५८·२
शके १६१५ चा चंद्र	०	१८	१६·९

२ रें उदा० शके १७७२ रांत कार्तिक शुद्ध ५ मीस उदयानंतर २७ घ० ८ प० यावेळेस सायनमध्यमचंद्र, स्पष्टचंद्र, चंद्रबिंब, वगैरे यांचीं मानें काय काय येतील तीं सांग.

२ रे किंवा ३ रे कोष्टकावरून इष्ट शकाचें चंद्राचें मान घेऊन, त्यास ४ थे कोष्टकावरून कालांतरानें जो भेद पडणार तो भेद कर, नंतर मेष संक्रांतीपासून कार्तिक शुद्ध ५ मी २१२ दिवसांनी येत्ये ह्मणून त्यांत इतके दिवसांची व २७ घ० ८ प० यांची गति, ५वे व ६ वे कोष्टकांवरून घेऊन मिळीव.

	मध्यमचंद्र रा० अं० क०	चंद्रमध्यमकेंद्र रा० अं० क	चक्रशुद्धराहु रा० अं० क०
२रें को०शके१७७२	०..७..५६·१	२..१६..५६·४	७..९..८·२
५वें को०२१२दिवस	९..२..२३·८	८.० ९..४६·७	११.१२·६
६वें को० २७ घटि	५..३५·८	५..५२·८	१·४
८पळें	१·८	१·८	०
शके १७७२का. शु.५.	९..१७..१७·५	११..२..३४७	७.२..२३·२

याप्रमाणें मध्यमचंद्र, चंद्रमध्यमकेंद्र, आणि चक्रशुद्धराहु हे शके १७७२ कार्तिक शुद्ध ५ मी २७ घ० ८ प० यावेळचे झाले. आतां हा मध्यमचंद्र स्पष्ट करण्याचा. पहिल्यानें रविसाधन कोष्टकांवरून सायनस्पष्टरवि आणि रविकेंद्र हीं काढलीं पाहिजेत. हीं यावेळचीं खालीं लिहिल्याप्रमाणें येतात.

सायन स्पष्ट रवि. ७..१६..४६ } रविसाधन
रविकेंद्र...... ४.. ७..५७ } कोष्टकांतील उदाहरण पाहावें.

नंतर रविकेंद्राचे साहायानें ७ वे कोष्टकांतून चंद्राचा प्रथम संस्कार काढावा, आणि तो मध्यम चंद्रास आणि चंद्रमध्यम केंद्रास द्यावा.

	रा० अं० क०		रा० अं० क०
मध्यमचंद्र	९..१७..१७·५,	केंद्र	११..२..३४·७
को० ७ वें संस्कार	+ ८·९,		+ ८·९
	९..१७..२६·४		११..२..४३·६

आतां चंद्राचा दुसरा संस्कार काढण्याकरितां पहिल्यानें ८ वे कोष्टकाचें उपकरण तयार करावें, तें असें

	रा० अं० क०
☾ = प्रथम संस्कृत चंद्र	९..१७..२६
☉ = स्पष्ट रवि	७..१६..४६
☾-☉	२...०..४०
२ (☾-☉) =	४.. १..२०,
चंद्रकेंद्र	११.. २..३४
८ वे कोष्टकाचें उपकरण =	४..२८..४६

हें उपकरण घेऊन त्याचे योगानें ८ वे कोष्टकांतून चंद्राचा दुसरा संस्कार घ्यावा, आणि तो चंद्रास आणि चंद्रमध्यम केंद्रास द्यावा.

	मध्यमचंद्र. रा० अं० क०	केंद्र. रा० अं० क०
प्रथम संस्कार युक्त.....	९..१७..२६·४	११..२..४३·६
८ वें को० द्वितीय संस्कार	- ४२·४	- ४२·४
द्वितीय संस्कार युक्त	९..१६..४४·०	११..२..१·२

आतां पहिल्यानें रविकेंद्र घेऊन त्यावरून ९ वे कोष्टकां-

तून संस्कार घेऊन तो द्वितीय संस्कारयुक्त चंद्रकेंद्रास द्यावा. आणि १०वे कोष्टकांतून संस्कार काढून चक्रशुद्ध राहूस द्यावा.

	रा०	अं०	क०		रा०	अं०	क०
चंद्रकेंद्र	११	२	१·२	चक्रशुद्ध राहू	७	२०	२३·३
९ वें को० संस्कार			+ १७·७	१० वें को० संस्कार			— ७·१
	११	२	१८·९		७	२०	२३·२

हा संस्कार देऊन आलेले केंद्राच्या आधारानें ११वे कोष्टकांतून फलसंस्कार काढून तो द्वितीय संस्कारयुक्त चंद्रास द्यावा.

	रा०	अं०	क०
द्वितीय संस्कारयुक्त चंद्र	९	१६	४४·०
११ वें को० उप० ११रा० २अं० १९क० संस्कार	+	२	४५·६
तृतीय संस्कारयुक्त चंद्र..................	९	१९	२९·६

या चंद्रांतून स्पष्ट रवीस वजा करावें ह्मणजे त्यावरून १२वे कोष्टकांतून चंद्राचा चतुर्थ संस्कार निघेल.

रा०	अं०	क०			रा०	अं०	क०
९	९	१९	२९	तृतीय संस्कृत चंद्र	९	१९	२९·६
०	७	१६	४६				
९-०	२	२	४६	......१२वे को०संस्कार....		+	२७·१
				चतुर्थ संस्कारयुक्त चंद्र............	९	१९	५६·६

हा चंद्र विक्षेप वृत्तावर स्पष्ट झाला. आतां त्याचे क्रांतिवृत्तावरचे अंश आणावयाचे, तेव्हां पहिल्यानें रवीचें मध्यमकेंद्र घेऊन त्यास संस्कृत चक्रशुद्ध राहु मिळीव, ह्मणजे चंद्राचे राहूपासूनचें अंतर येईल. या अंतराच्या साहायानें १३ वे कोष्टकांतून संस्कार काढून वरचे चंद्रास दे ह्मणजे क्रांतिवृत्तावर स्पष्ट चंद्र झाला.

	रा०	अं०	क०		रा०	अं०	क०
९	९	१९	५६·७		९	१९	५६·७
संस्कृत ०	७	२०	१६·२				
अंतर ९ चें	५	१०	१२·९	संस्कार १३वे को०			४·४
				क्रांतिवृत्तस्थ स्पष्टचंद्र.....................	९	२०	१·१

हा चंद्र आतां सर्व संस्कारांनीं संस्कृत झाला. ह्मणून शके १७७२ कार्तिक शुद्ध ५ मी.२७ घ० ८ प० या वेळचा स्पष्ट चंद्र ९ रा० २० अं० १'१क० इतका आहे.

आतां चंद्राचा स्पष्ट शर वगैरे काढण्याची रीति पुढें सांगतों.

शर.

आतां चंद्राचा शर काढण्याचा, तेव्हां पहिल्यानें चंद्राचें राहूपासून अंतर समजलें पाहिजे. परंतु तेरावे कोष्टकांतून चंद्राचा संस्कार काढण्याकरितां आपण तें काढून ठेविलें आहे. तें मागील उदाहरणांत ५ रा० १० अं० १३क० आहे. तेव्हां त्याचे अनुरोधानें १४ वे कोष्टकांतून शर काढला तर तो उत्तर १ अं० ४४'४ क० येतो.

परंतु मागें सांगितलेले सूर्याचे आकर्षणानें चंद्राचे शरांत फेर पडतो तेव्हां तो फेर यावर आलेले शरास दिला पाहिजे.

यासाठीं १२वे कोष्टकांतून चंद्राचा संस्कार काढतांना जें उपकरण घेतलें होतें त्याचे दुपटींतून १३वे किंवा १४ वें कोष्टकाचें उपकरण वजा करावें आणि तें १५ वें कोष्टकाचे उपकरण समजून त्यापासून त्या कोष्टकांतून शरास देण्याचा संस्कार काढून तो द्यावा. मागील उदाहरणांत,

	रा०	अं०	क०		अं०	क०
१२वें को० उपकरण	२	२	४२	चंद्राचा शर	+१	४४'४
दुपट	४	५	२६			
१४ वें को० उपकरण	५	१०	१३			
१५वें को० उपकरण	१०	२५	१३	संस्कार १५वें को०		-४'५
				चंद्राचा संस्कृत शर	+१	३९'९

स्पष्टगति.

चंद्राची साधारण मध्यमगति एका दिवसाची १३ अं० १०.६ कला आहे. परंतु स्पष्टगति काढण्याकरितां या गतीस कांहीं संस्कार करावे लागतात. मध्यम चंद्रास जेवढे संस्कार आहेत तेवढे मध्यमगतीस दिले पाहिजेत कारण तितक्या रितींनीं तिजमध्यें भेद पडतो, परंतु लक्षांत येण्याजोगा भेद असा फलसंस्कार इवेक्शन आणि वेरियेशन यांणीं मात्र येतो. ह्मणून चंद्र गतीस आह्मी तीन कारणांनीं झालेले संस्कार मात्र एथें दिले आहेत. हे संस्कार पुढें सांगतों त्याप्रमाणें काढावे.

८ वे कोष्टकाचें उपकरण घेऊन त्याणें १६ वे कोष्टकांतून संस्कार काढावा; ११ वे कोष्टकाचें उपकरण घेऊन त्याणें १७ वे कोष्टकांतून संस्कार काढावा. आणि १२ वे कोष्टकाचें उपकरण घेऊन त्याणें १८ वे कोष्टकांतून संस्कार काढावा. नंतर हे तीन्ही संस्कार चंद्राचे मध्यम गतीस घ्यावे ह्मणजे स्पष्टगति येत्ये.

	रा०	अं०	क०				क०
चंद्राची मध्यमगति		१३	१०.६	=			७९०.६
८वें को० उप०	४	२८	४६	संस्कार	१६ वें को०	+	१४.६
११वें को० उप०	११	२	२९	—	१७ वें को०	−	७६.०
१२वें को० उप०	२	२	२३	—	१८ वें को०	−	११.०
स्पष्टगति		११अं.	५८.२क.	=			७१८.२

चंद्र बिंब.

चंद्राचे स्पष्टगतीचे आधारानें हें १९ वे कोष्टकावरून काढतां

येतें. मागील उदाहरणांत चंद्राची स्पष्टगति ७१८ कला आहे या अंकांसमोर १९ वे कोष्टकांत २९.८ कला हें चंद्राचे बिंब समजावें.

चंद्र लंबन.

हेंही १९ वे कोष्टकाचे आधाराने, चंद्राचे स्पष्टगतीवरून काढतां येतें. मागील उदाहरणांतील ७१८ कला चंद्राचे स्पष्टगती समोर ५४.६ कला चंद्राचें लंबन सांपडतें.

भूभा.

ही ही पण १९ वे कोष्टकावरून काढतां येते. ७१८ समोर ७७.३ कला हें भूभेचें मान समजावें.

चंद्र ग्रहणाचे गणित करणें झाल्यास भूभा काढावी लागते.

मागील व्याख्यानांत चंद्रसंबंधीं गणित सांगितलें तें करतांना सोईवार मांडण्याची रीति पुढील पत्रांत दाखविली आहे ती प्रमाणें मांडावें.

शके १७७२ कार्तिक शुद्ध ५ शनिवार २७ घ० ८ पळें
मेषसंक्रांतीपासून इष्टकालपर्यंत दिवस २१२.

कोष्टक		चंद्र.	केंद्र.	राहू.
		रा० अं० क०	रा० अं० क०	रा० अं० क०
२रें	शके१७७२-	०..७..५६·१	२..१६..५२·४	७ .. ९.. ८·३
५वें	दिवस २१२-	९..३..२३·८	८.. ९..४६·७	११..१२·६
६वें	घटि० २७-	५..५५·८	५..५२·८	१·४
	पळें ८-	१·८	१·८	०·०
	मध्यम ☾.	९..१७..१७·५	११.. २..३४·७	७...२०..२३·२
७वें	प्र०सं०	+ ८·९	+ ८·९	१०वेंको०-७·१
	☾,	९..१७..२६·४	९वेंको. +१७·७	७...२०..१६·२
८वें	द्वि०सं०	-४२·४	-४२·४	
		९..१६..४४·०	११.. २..१८·९	
	☾,,			
११वें	ति०सं०	+ २ ..४५·६		
	☾,,,	९..१९..२९·६		
१२वें	च०सं०	+ २७·१		
	☾,,,,	९..१९..५६·७		
१३वें	पां०सं०	+ ४·४		
	स्पष्टचंद्र	९..२०.. १·१		
१४वें	शर.	+ १..४४ ४		
१५वें	सं०—	- ४·९		
	स्प.शर.	उत्तर १..३९·५		

मध्यमगति— ७९०·६
को० १६वें, संस्कार +१४·६
को० १७वें, संस्कार -७६·०
को० १८वें, संस्कार -११·०
स्पष्टगति ७१८·२

को० १९ वें.
परम लंबन..........५४·६
चंद्रबिंब..........२९·८
भूभाबिंब ....७७·२

टीप. चंद्र पुष्कळ मागचा किंवा पुढचा करावयाचा झाल्यास त्यास कालांतराचा संस्कार करावा लागतो. हा कालांतर संस्कार ४ थे कोष्टकांत दिला आहे आणि त्यांत रविसाधन कोष्टकांतील कालांतर संस्कारही मिळवावा लागतो.

उपकरणी.

		उपकरण. रा. अं. क.	को०	संस्कार. अं. क.
चंद्र पहि० सं०	रवि म० केंद्र	४.. ७..५६	७वें.	+ ८.९
	☾,	९..१७..२६		
	☉	७..१६..४६		
	☾,-☉	२.. ०..४०		
	२(☾,-☉)	४.. १..२०		
	चं० केंद्र	११.. २..२४		
चं० दु० सं०	२(☾,-☉)-चं०कें०	४..२८..४६	८वें.	—४२.४
चं०कें० संस्का	र० म०कें०	४.. ७..५६	९वें.	+ १७.७
राहूस संस्कार	र०म० कें०	४.. ७..५६	१०वें.	—७.१
चं० ति० सं०	संस्कृत चं०कें	११.. २..१९	११वें.	+२..४५.६
	☾,,,	९..१९..२९		
	☉	७..१६..४६		
चं० च० सं०	☾,,,-☉	२.. २..४३	१२वें.	+ २७.१
	☾,,,,	९..१९..५७		
	☊	७..२०..१६		
चं० पा० सं०	☾,,,,+☊	५..१०..१३	१३वें.	+ ४.४
शर.		५..१०..१३	१४वें.	+१..४४.४
	उपक० १२वें. को०	२.. २..४३		
	दुपट	४.. ५..२६		
	उपक. १४ को०	५..१०..१३		
शरास संस्कार	अंतर.	१०..२५..१३	१५वें.	-४.९

चंद्रसाधन कोष्टकें तयार करितांना जे क्षेपक घेतले ते खालीं दाखविले आहेत.

		दि०	घ०	प०
हिंदी सौरवर्षाचें मान		३६५	१५	३१·५३३३३

		रा०	अं०	क०	वि०
शके १८०० मेषसंक्रांत.	सायनमध्यम चंद्र	४	१५	१२	११·८
	चंद्रमध्यम केंद्र	४	२४	४१	४८·५
	चक्रशुद्ध राहू	१	१०	४५	३९·६
वर्षगति. सौरवर्ष.	सायनमध्यम चंद्र	४	१२	४७	३९·०
	चंद्रमध्यम केंद्र	३	२	६	९·४
	चक्रशुद्ध राहू	०	१९	२०	३२·७

कालांतराचा संस्कार.

$$व = \frac{(इष्टशक - १६२२)}{१००}$$

मध्यमचंद्रास भेद = १०·१८१६२१२६८ वि. व^{२} + ०·०१८५३८४४०८ वि. व^{३}

चंद्रमध्यम केंद्रास ४·०००५२ × मध्यमचंद्रांतील भेद

चक्रशुद्ध राहूंत −०·७३५४५२ × मध्यमचंद्रांतील भेद.

☉ = स्पष्टरवि स = रविकेंद्र

☾ = मध्यमचंद्र क = चंद्रकेंद्र

☊ = चक्रशुद्ध राहू

	क. वि.		वि.	
वरचे दुसरे उदाहरणांत अक्षांश १० आणि क्रांति २० अंश आहे तेव्हां रीतीप्रमाणें.

चर संस्कार $= \frac{२० \times १०}{५} = \frac{२००}{५} =$ ४० पळें, हे उत्तर वरील
जवळ आहे.

दिनमान व रात्रिमान.

चरसंस्कार शून्य असला ह्मणजे दिनमान व रात्रिमा
दोन्ही १२ तास अथवा ३० घटिकांचीं असतात. क्रांति
अक्षांश यादोहींतून एक शून्य असलें ह्मणजे चरशून्य
ह्मणून.

१. निरक्ष देशीं दिनमान बारामास ३० घटिकांचें अ

२. सर्व पृथ्वीवर वर्षांतून दोन दिवस बरावर ३० घ
चे असतात. हे दोन विषुव दिवस, ह्मणजे ज्या दिवशीं सूर्य
वृतांत जातो ते दिवस. हे दिवस २१ मार्च आणि २३ स
या सुमारास येतात.

इतर दिवशींचें दिनमान काढणें झाल्यास चर संस्का
दुपट करून चर धन असल्यास ती ३० घटिकेस मिळवावी,
असल्यास वजा करावी ह्मणजे सांपडते ६० घटिकांतून वजा
दिनमान ह्मणजे रात्रिमान येतें.

उदा० मुकाम मुंबईस जूनचे २१वे तारखेचें दिनमान
अक्षांश १८ अं० ५४क० उ०. क्रांति. २३°२७′ उ

उत्तर चर =	१ घ०	२७ प०
दुपट	२	५४
दिनमान	३२	५४
रात्रिमान	२७	६

१२४ वे पत्रावरचे कोष्टकांत दर पांच पांच अक्षांशावरील वर्षांतून अति मोठें व अति लहान दिनमान किती असतें तें दाखविलें आहे.

या कोष्टकावरून असें ध्यानांत येईल कीं ७० अक्षांशावरच ६४ दिवस ह्मणजे दोन महिन्याचा एक दिवस होतो. आणि धुवावर सहा महिन्याचा दिवस व सहा महिन्याची रात्र होत्ये.

मध्यम व स्पष्टकाल.

इंग्रजी घडियाळें मध्यमकालाचे अनुरोधानें चालतात, परंतु रवीचा वेधानें स्पष्टकाल येतो. तेव्हां यांत जें अंतर तें १२५ व १२६ पत्रांवरचे कोष्टकांत दिलें आहे.

* उदा० छायायंत्रानें स्पष्टकाळ येतो. आमचे घरचे छायायंत्रांत संध्याकाळचीं २ अ० ३० मि० झालीं आहेत. आमचे घडियाळांत त्यावेळेस किती वाजावे. आज मार्च महिन्याची १० वी तारीख आहे. उत्तर. २ अ० ४० मि०

सूर्योदय व सूर्यास्त.

मध्यमसूर्याचा उदय ० घटिकेस, आणि अस्त ३० व्यें घ-

* हे अंतर पलात्मक आणि रवि भोगांचे संबंधानें हवें लागल्यास रवि साधन कोष्टकांत १२ वे कोष्टकांत पहावें.

टिकेस होतो; इंग्रजी घडियाळांनें उदय सकाळचे ६ वाजतां व अस्त संध्याकाळचे ६ वाजतां होतो.

परंतु स्पष्ट सूर्याचे उदयास्त याप्रमाणें होत नाहींत, ह्मणून ते काढणें झाल्यास पुढील कृत्य करावें.

ज्या दिवशींचा स्पष्ट सूर्याचा उदय किंवा अस्त काढण्याचा असेल, त्या दिवशींचे चर आणि कालांतरभेद साधून त्यांचा, मध्यम सूर्याचे उदयास्त कालांस, संस्कार करावा.

चरधन असल्यास स्पष्ट सूर्यांचा उदय मध्यम सूर्याचे उदयाचे अगोदर होतो आणि अस्त मागून होतो.

याप्रमाणें चरसंस्कार देऊन आणलेले काळास कालांतरभेद धन असल्यास मिळवावा आणि ऋण असल्यास वजा करावा. ह्मणजे स्पष्ट सूर्याचा उदय किंवा अस्त येईल.

उदाहरण. तारीख १० माहे मार्च, यादिवशीं स्पष्टसूर्याचा उदय केव्हां होईल? घडियाळ इंग्रजी रितीचें अ. मि.

मध्यम सूर्योदय = ६..०

अं० क०

अक्षांश १८.५४ उ. } चरसंस्कार
क्रांति. ४.११ द } −१३=पळें= + ५

कालांतरभेद. कोष्ट. पत्र १२५= + १०

स्पष्टसूर्याचा उदय.. ६ १५

उ० तारीख १० माहे मार्च याच दिवशीं स्पष्ट सूर्याचा अस्त मराठी रितीनें किती घटिकेस होईल तें सांग.

घ प

मध्यम सूर्याचा अस्त= ३०....०

चर संस्कार, उलट = − १३

कालांतर भेद. १०मिन्युटें= + २५

स्पष्ट सूर्याचा अस्त ..३०....१२

कोष्टक.

उपकरण. अक्षांश आणि स्पष्ट क्रांति.

उत्तरी. स्पष्टक्रांति	अक्षांश.																			
	०°		१०°		२०°		३०°		४०°		५०°		६०°		७०°		८०°		९०°	
०°	घ.	प.	घ.	प.	घ.	प.	घ.	प.	घ.	प.	घ.	प.	घ.	प.	घ.	प.	घ.	प.	घ.	प.
०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	—	—
१	०	०	०	२	०	४	०	६	०	८	०	१२	०	१७	०	२८	०	५६	—	—
२	०	०	०	४	०	७	०	११	०	१७	०	२४	०	३४	०	५६	१	५४	—	—
३	०	०	०	५	०	११	०	१७	०	२५	०	३६	०	५१	१	२३	२	५३	—	—
४	०	०	०	७	०	१४	०	२३	०	३४	०	४८	१	९	१	५१	३	५४	—	—
५	०	०	०	९	०	१८	०	२९	०	४२	१	०	१	२७	२	१९	४	५७	—	—
६	०	०	०	११	०	२२	०	३४	०	५१	१	१२	१	४५	२	४८	६	६	—	—
७	०	०	०	१२	०	२५	०	४०	१	०	१	२४	२	३	३	१७	७	२१	—	—
८	०	०	०	१४	०	२९	०	४६	१	९	१	३६	२	२१	३	४७	८	४९	—	—
९	०	०	०	१६	०	३३	०	५२	१	१७	१	४८	२	३९	४	१८	१०	३९	—	—
१०	०	०	०	१८	०	३७	०	५८	१	२५	२	१	२	५८	४	५०	१५	०	—	—
११	०	०	०	२०	०	४०	१	४	१	३४	२	१४	३	१७	५	१३	—	—	—	—
१२	०	०	०	२२	०	४४	१	१०	१	४३	२	२७	३	३६	५	५७	—	—	—	—
१३	०	०	०	२३	०	४८	१	१६	१	५२	२	४०	३	५६	६	३४	—	—	—	—
१४	०	०	०	२५	०	५२	१	२२	२	१	२	५३	४	१६	७	१२	—	—	—	—
१५	०	०	०	२७	०	५६	१	२९	२	१०	३	६	४	३६	७	५४	—	—	—	—
१६	०	०	०	२९	१	०	१	३५	२	१९	३	२०	४	५७	८	४०	—	—	—	—
१७	०	०	०	३१	१	४	१	४१	२	२९	३	३४	५	१९	९	३१	—	—	—	—
१८	०	०	०	३३	१	८	१	४७	२	३८	३	४८	५	४२	१०	३२	—	—	—	—
१९	०	०	०	३५	१	१२	१	५४	२	४८	४	२	६	६	११	५१	—	—	—	—
२०	०	०	०	३७	१	१६	२	१	२	५८	४	१७	६	३१	१५	०	—	—	—	—
२१	०	०	०	३९	१	२०	२	८	३	८	४	३२	६	५८	—	—	—	—	—	—
२२	०	०	०	४१	१	२५	२	१५	३	१९	४	४८	७	२६	—	—	—	—	—	—
२३	०	०	०	४३	१	२९	२	२२	३	२९	५	४	७	५५	—	—	—	—	—	—
२४	०	०	०	४५	१	३३	२	२९	३	४०	५	२०	८	२६	—	—	—	—	—	—
२५	०	०	०	४७	१	३८	२	३३	३	५०	५	३७	८	५९	—	—	—	—	—	—
२६	०	०	०	४९	१	४२	२	४३	४	०	५	५६	९	३७	—	—	—	—	—	—
२७	०	०	०	५१	१	४७	२	५०	४	११	६	१४	१०	२०	—	—	—	—	—	—
२८	०	०	०	५३	१	५१	२	५८	४	२३	६	३६	११	१०	—	—	—	—	—	—
२९	०	०	०	५५	१	५६	३	५	४	३६	६	५४	१२	१६	—	—	—	—	—	—
३०	०	०	०	५८	२	१	३	१३	४	५०	७	१५	१५	०	—	—	—	—	—	—
३१	०	०	१	०	२	६	३	२१	५	३	७	३७	—	—	—	—	—	—	—	—

अति मोठें व अति लाहान दिनमान.

उपकरण अक्षांश.

अक्षांश.	अतिमोठें दिनमान.		अतिलाहान दिनमान.	
	घ०	प०	घ०	प०
०	३०	०	३०	०
५	३०	४४	२९	१६
१०	३१	२८	२८	३२
१५	३२	१४	२७	४६
२०	३३	२	२६	५८
२५	३३	५४	२६	६
३०	३४	५१	२५	९
३५	३५	५५	२४	५
४०	३७	८	२२	५२
४५	३८	३६	२१	२४
५०	४०	२५	१९	३५
५५	४२	४८	१७	१२
६०	४५	१६	१३	४५
६५	५२	२०	७	४०
७०	६४ दिवसपर्यंत सतत सूर्य दर्शन.		६४ दिवसपर्यंत सततरात्र	
७५	१०४दिवस सूर्यदर्शन.		१०४ दिवस रात्र	
८०	१३४दिवस सूर्यदर्शन.		१३४ दिवस रात्र	
८५	१६०दि० सू० द०		१६० दिवस रात्र	
९०	१८२दि० सू० द०		१८२ दिवस रात्र	

कोष्टक.

मध्यम व स्पष्टकाल यांतील अंतर.

तारी०	जानुवा.	फेब्रुवा.	मार्च	एप्रिल	मे	जून	तारी०
	मि.	मि.	मि.	मि.	मि.	मि.	
१	+ ४	+१४	+१३	+ ४	— ३	—३	१
२	४	१४	१२	४	३	२	२
३	५	१४	१२	३	३	२	३
४	५	१४	१२	३	३	२	४
५	६	१४	१२	३	३	१	५
६	६	१४	११	३	४	१	६
७	७	१४	११	२	४	१	७
८	७	१४	११	२	४	१	८
९	७	१४	११	२	४	१	९
१०	८	१४	१०	१	४	१	१०
११	८	१४	१०	१	४	१	११
१२	८	१४	१०	१	४	—१	१२
१३	९	१४	१०	१	४	०	१३
१४	९	१४	९	०	४	०	१४
१५	१०	१४	९	०	४	०	१५
१६	१०	१४	९	०	४	०	१६
१७	१०	१४	९	०	४	०	१७
१८	११	१४	८	१	४	+१	१८
१९	११	१४	८	१	४	१	१९
२०	११	१४	८	१	४	१	२०
२१	१२	१४	७	१	४	१	२१
२२	१२	१४	७	२	४	२	२२
२३	१२	१४	७	२	४	२	२३
२४	१२	१३	६	२	३	२	२४
२५	१३	१३	६	२	३	२	२५
२६	१३	१३	६	२	३	२	२६
२७	१३	१३	५	२	३	३	२७
२८	१३	१३	५	३	३	३	२८
२९	१३	+१३	५	३	३	३	२९
३०	१४		५	— ३	३	+३	३०
३१	+१४		+ ४		३		३१

\+ असल्यास स्पष्ट कालांत या कोष्टकांतील अंक मिळवावे,

— असल्यास वजा करावे ह्मणजे मध्यमकाल येतो.

कोष्टक

मध्यम व स्पष्टकाल यांतील अंतर.

तारी०	जुलै	आगष्ट	सप्तंबर	अकटोबर	नोवेंबर	डिसेंबर	तारी०
	मि.	मि.	मि.	मि.	मि.	मि.	
१	+ ३	+ ६	— ०	—१०	—१६	—११	१
२	४	६	०	११	१६	१०	२
३	४	६	१	११	१६	१०	३
४	४	६	१	११	१६	१०	४
५	४	६	१	१२	१६	९	५
६	४	६	२	१२	१६	९	६
७	५	५	२	१२	१६	८	७
८	५	५	२	१२	१६	८	८
९	५	५	३	१३	१६	७	९
१०	५	५	३	१३	१६	७	१०
११	५	५	३	१३	१६	७	११
१२	५	५	४	१३	१६	६	१२
१३	५	५	४	१४	१६	६	१३
१४	५	४	४	१४	१५	५	१४
१५	६	४	५	१४	१५	५	१५
१६	६	४	५	१४	१५	४	१६
१७	६	४	५	१४	१५	४	१७
१८	६	४	६	१४	१५	३	१८
१९	६	३	६	१४	१४	३	१९
२०	६	३	७	१५	१४	२	२०
२१	६	३	७	१५	१४	२	२१
२२	६	३	७	१५	१४	१	२२
२३	६	३	८	१५	१३	—१	२३
२४	६	२	८	१५	१३	०	२४
२५	६	२	८	१६	१३	०	२५
२६	६	२	९	१६	१३	+ १	२६
२७	६	१	९	१६	१२	१	२७
२८	६	१	९	१६	१२	२	२८
२९	६	१	—१०	१६	१२	२	२९
३०	६	०	१०	—१६	—११	३	३०
३१	+ ६	+ ०		१६		+ ३	३१

चंद्रग्रहण.

रवि आणि चंद्र यांचे कोष्टकांतून पर्वांतींचीं पुढील मानें आणावीं.

स्पष्ट रवि; स्पष्ट चंद्र; रवि आणि चंद्र याचा दिन स्पष्ट गति; राहू; चंद्राचा स्पष्ट शर; स्पष्ट शरांतील दिनभेद; चंद्र बिंब, आणि भूभा.

स्पष्ट चंद्र आणि स्पष्ट रवि यांचा कला सारख्या नसल्यास त्यांचा स्पष्ट गतींचा अनुरोधानें त्यासारख्या येत असें करावें, आणि तसें करतांना पर्वांतांत जो भेद करावा लागेल तो करावा. कालसाधन कोष्टकांचे आधारानें पंचांगांतील घटिका आणल्या असतात त्या अगदीं बरोबर नसतात, साधारण व्यवहारास पुरत इतक्या असतात ह्मणून ग्रहण वगैरे जेथें शुद्ध कालाची गरज लागते तेथे पंचांगांतील कालांत भेद करावा लागतो.

रवि आणि चंद्र यांचा सम कला येत असा शुद्ध पर्वांत काढल्यावर त्यावेळचा राहू आणि चंद्राचा शर आणावा.

नंतर चंद्रांतून राहु वजा करावा आणि त्या अंशांचा भुज जर १३° अंशांपेक्षां अधिक असला तर ग्रहण होणार नाहीं; जर १३ अंशांपेक्षां कमी, पण ९ अंशांपेक्षां अधिक असला तर ग्रहणाचा संभव; परंतु जर ९ अंशांपेक्षां कमी असला तर ग्रहण खचित होईल. याप्रमाणें ग्रहण होतें किंवा नाहीं हें काढल्यावर

चंद्रबिंब आणि भूभा यांचें मानैक्य करून त्याचें अर्ध करावें. हें मानैक्य खंड शरापेक्षां अधिक असलें तर ग्रहण खचित होईल, आणि कमी असल्यास होणार नाहीं. याप्रमाणें पाहून खचित होईल असें आल्यास, मानैक्यार्धखंडासारखें मानांतर खंड करावें. हें मानांतर खंड जर शरापेक्षां अधिक असलें तर ग्रहण खग्रास होईल, कमी असल्यास खग्रास व्हावयाचें नाहीं ग्रास मात्र होईल.

नंतर चंद्राचे गतींत रवीची स्पष्ट गति वजा द्यावी ह्मणजे भूभा संबंधानें चंद्राची गति येत्ये या गतीस चंद्राची विशिष्ट गति ह्मणतात.

मानैक्यार्धखंडांतून शर वजा केला ह्मणजे ग्रास येतो. ग्रासाचें कलांस ३ नीं भागलें ह्मणजे अंगुलात्मक ग्रास येतो.

चंद्राचा शर दक्षिण असल्यास ग्रास उत्तर बाजूनें होतो; आणि उत्तर असल्यास दक्षिण बाजूनें होतो.

मानैक्यखंडांत शर मिळवावा, आणि त्या बेरजेस ग्रासानें गुणावें. नंतर या गुणाकाराचें वर्गमूळ काढून त्या वर्गमूळास चंद्राचे विशिष्ट गतीनें भागावें. या भागाकारास स्थिति अशी संज्ञा आहे. स्थिति ह्मणजे ग्रहण मध्यापासून स्पर्श किंवा मोक्ष इथपर्यंत काळ.

ग्रहण खग्रास असल्यास आणखी एक स्थिति काढावी लागते, ती अशी. मानांतर खंडांत एकदां शर मिळवावा आणि एकदां त्यांतून वजा करावा नंतर या वजाबाकीस त्या बेरजेनें गुणावें. या गुणाकाराचें वर्गमूळ घेऊन त्यास चंद्राचे विशेष गतीनें भागावें ह्मणजे, खग्रास स्थिति येत्ये. या स्थितीचे योगानें खग्रासापासून ग्रहणमध्यपर्यंत किती काळ जातो हें समजतें.

आतां पहिल्यानें पर्वांतापासून ग्रहणमध्यकाळ साधला पाहिजे. यासाठीं मागें चंद्र आणि राहु यांचे अंतराचा भुज काढला आहे, या भुजांतील अंशांची दुप्पट करून तेवढ्या कळा ह्मणाव्या आणि इतका संस्कार समकला पर्वांतास केला ह्मणजे ग्रहण मध्य येतो.

राहूपुढें चंद्र ० किंवा ६ राशी वर असला तर ही पळें वजा करावी; आणि ६ किंवा १२ राशी मागे असला तर तेवढीं पळें मिळवावीं.

नंतर स्पर्श, मोक्ष, खग्रास यांचा स्थितींपासून पुढील रितीनें स्पर्श, मोक्ष, वगैरे काळ आणावे.

स्पर्श काल = ग्रहण मध्य — स्पर्श स्थिति
संमीलन काल = ग्रहण मध्य — खग्रास स्थिति
ग्रहण मध्य = ग्रहण मध्य.
उन्मीलन काल = ग्रहण मध्य + खग्रास स्थिति
मोक्ष काल = ग्रहण मध्य + मोक्ष स्थिति

स्पर्श व मोक्ष यांचें अंतर काढून पर्वकाळ सांगावा.

स्पर्श मोक्ष दिशा.

साधारणपणानें चंद्र ग्रहणांत स्पर्श नेहेमीं पूर्वेकडचे बाजूनें होतो आणि मोक्ष पश्चिम बाजूनें होतो. परंतु अमकेच ठिकाणीं स्पर्श होईल असें काढण्यास पुढील गणित करावें.

शरास त्रिज्येनें गुणावें आणि मानैक्यखंडानें भागावें. भागाकार ज्या कोणाची स्वाभाविक कोभुजज्या असेल तितके अंश स्पर्श

उत्तरेकडून पूर्वेकडे होईल आणि मोक्ष पश्चिमेकडे होईल असें समजावें. ग्रास दक्षिणेस असल्यास त्या दिशा दक्षिणेकडून समजाव्या. ह्या दिशा विक्षेपवृत्तसंबंधानें येतात. यांस विक्षेपवलनाचा, क्रांतिवलनाचा, आणि अक्षवलनाचा असे तीन संस्कार केले ह्मणजे पूर्वापर संबंधानें दिशा येतात.

विक्षेपवलन सर्वदा ५ अंश धरावें, क्रांतिवलन व अक्षवलन हीं, १५३ आणि १५२ या पत्रांवरचे कोष्टकावरून साधावीं.

मागें सांगितलेली रिति चांगली लक्षांत यावी याजकरितां एक उदाहरण खालीं करून दाखविलें आहे.

शके १७७२ रांत पौष शु॥ १५ शुक्रवार यादिवशीं चंद्रग्रहण होतें, त्याचे स्पर्श मोक्ष इत्यादि काल काढण्याचे.

			घ०	प०
पंचांगांतील पर्वांत.	———		३८ ..	१६

		रा०	अं०	क०
यावेळचा स्पष्टरवि.	———	९ ..	२७ ..	२·५
स्पष्टचंद्र	———	३ ..	२६ ..	५१·९
रवीची स्पष्टगति.	———		१ ..	१·०
चंद्राची स्पष्टगति.	———		१५ ..	६·९
राहु.	———	४ ..	५ ..	५४·४
चंद्र शर.	———	द०		४७·३
	घटि. गति.			+ १·१
चंद्रबिंब.	———			३३·५
भूभाबिंब.	———			९१·२

या पर्वांतीं रविचंद्राच्या समकला नाहींत. यासाठीं समकला

होण्याचा काल त्यांच्या गतीचे अनुरोधानें केला तो ३९ घ० १ प० इतका आला. यासाठीं

समकला पर्वांत.	—	३९ घ० १ प०		
		रा०	अं०	क०
यावेळचा स्पष्टरवि.	—	९..	२७..	३·२
स्पष्टचंद्र.	—	३..	२७..	३·२
शर	—	द.		४६·४

आतां ग्रहणाचा संभव आहे किंवा नाहीं तें पाहावयाचें

		रा०	अं०	क०
चंद्र	—	३..	२७..	३·२
राहु	—	४..	५..	५४·४
राहूपासून चंद्राचें अंतर	—		८	५१·२

हें अंतर ९ अंशांपेक्षां कमी आहे तेव्हां ग्रहण खचीत होईल. ह्मणून.

चंद्रबिंब	३३·७		३३·५
भूभा	९१·२		९१·२
मानैक्य.	१२४·७	मानांतर	५७·७
खंड	६२·३		२८·८

चंद्राचे शरापेक्षां (४६·४ कलांपेक्षां) मानैक्यखंड अधिक आहे आणि मानांतर कमी आहे ह्मणून ग्रहण खग्रास व्हावयाचें नाहीं, चंद्राचा कांहीं ग्रास मात्र होईल.

मानैक्य खंड	६२·३	६२·३	
शर	४६·४	४६·४	
ग्रास	१५·९	१०८·७	बेरीज
ग्रास अंगुलात्मक	५·३		

आतां ग्रहण मध्यकाल काढण्याचा.

	रा०	अं०	क०
स्पष्टचंद्र	३	२७	३·२
राहु	४	५	५४·४
चंद्र – राहु	११	२१	८·८
भूज	८	५१	२

चंद्र उणा राहु यांचा भूज सुमारें ९ अंश आहे. तेव्हां त्यांची दुप्पट १८ इतकीं पळें पर्वांतांत मिळविलीं. कारण अंतर १२ राशींपेक्षां कमी आहे, ह्मणजे ग्रहणमध्य काल झाला.

	घ०	प०
पर्वांत.	३९	१
संस्कार		१८
ग्रहण मध्य	३९	१९

आतां स्पर्श व मोक्षस्थिति काढण्याची.

मानैक्यखंड ६२·३ यांत शर ४६·४ मिळविला ह्मणजे बेरीज १०८·७ होत्ये. ग्रास १५·९ आहे. यांचा गुणाकार १७२८·३३ झाला. याचें वर्गमूळ ४३·० झालें. यास विशिष्ट गतीनें भागिलें ह्मणजे स्थिति येईल.

	अं०	क०
चंद्रगति	१५	६·९
रविगति	१	१·०
विशिष्ट दिनगति	१४	५·९
विशिष्ट घटिगति		१४·१

स्थिति = $\frac{४३०}{१४·१}$ = ३ घ० ३ प०

	घ०	प०		घ०	प०		घ०	प०
स्पर्शकाल =	३९	१९	−	३	३	=	३६	१६
मोक्षकाल =	३९	१९	+	३	३	=	४२	२२

आतां स्पर्श मोक्ष दिशा काढवयाचा.

शर ४६·४ यांस मानैक्यखंड ६२·३ याणें भागिलें तर भागाकार ०·७४५ ही ४८ अंशाची स्वाभाविक कोभुजज्या आहे.

	अं०		
आतां विक्षेपवलन	५	उत्तर	
क्रांतिवलन	१०	उत्तर	पत्र १५३
अक्षवलन.	१२	उत्तर	पत्र १५२

अं० अं० अं० अं० अं०

स्पर्शदिशा ४८ − ५ − १० − १२ = २१ उत्तरेपासून पूर्वेस

मोक्षदिशा ४८ + ५ + १० + १२ = ७५ उत्तरेपासून पश्चिमेस

सारांश.

चंद्रग्रहण. मुकाम मुंबई शके १७७२ पौषशुद्ध १५ शुक्रवार

	घ०	प०		घ०	प०
स्पर्शकाल −	३६	१६			
ग्रहणमध्य −	३९	१९	पर्वकाल	६	६
मोक्षकाल −	४२	२२			

ग्रास. ५·३ अंगुळें.

स्पर्श उत्तरेपासून २१ पूर्वेकडे

मोक्ष उत्तरेपासून ७५ अंश पश्चिमेकडे.

कित्येक अंशीं ग्रहणाची आकृति काढली असतां फार सुलभ पडून गणित फार वांचतें आणि ग्रहणांतील वेगळाले प्रकार ही चांगले लक्षांत येतात. इतकेंच कीं आकृति मात्र चांगली काढतां आली पाहिजे.

आकृतीनें चंद्रग्रहणाचा काळ काढण्याचें झालें तर सम कंला देखील कराव्या लागत नाहींत. पर्वांतींचे जे ग्रह दिले असतील त्यांवरून पर्वांतापूर्वी ३ घटिकांचे आणि पर्वांतानंतर तीन घटिकांचे स्पष्ट चंद्र व स्पष्ट रवि इतके मात्र करावे लागतात ह्मणजे झालें. आणि हें काम चंद्ररवींच्या स्पष्ट गति दिल्या असतात त्यांवरून लागलेंच होतें.

मागें केलेलें ग्रहण आकृतीनें पुढें दाखविलें आहे त्यावरून हें काम कसें करावें हें लक्षांत येईल.

	भूभा			चंद्र.			शर
	रा०	अं०	क०	रा०	अं०	क०	
पर्वांतीचे ग्रह.	३	२७	२·५	३	२६	५१·९	द. ४७·२
घटिगति ..		—	१·०		—	१५·१	
१ घटीपूर्वी.		२७	१·५		२६	३६·८	
२ घटीपूर्वी		२७	०·५		२६	२१·७	
३ घटीपूर्वी		२६	५९·५		२६	६·६	
१ घटीनंतर		२७	३·५		२७	७·०	
२ घटीनंतर		२७	४·५		२७	२२·१	
३ घटीनंतर		२७	५·५		२७	३७.२	

भूभा रवीमध्यें ६ राशी वजा केल्यानें किंवा मिळविल्यानें येती.

नंतर वरील अंकांची वजाबाकी घेऊन प्रत्येक घटिकेस भूभेचे पूर्वेस किंवा पश्चिमेस चंद्र किती आहे तो काढावा. भूभेपेक्षां

चंद्राचे अंश अधिक असले ह्मणजे चंद्र पूर्वेस आहे असें समजावें, कमी असल्यास पश्चिमेकडे आहे असें समजावें.

भूभेपासून चंद्र.				चंद्रशर.
पर्वांतापूर्वी	३ घटि	पश्चिमेस.	५२·९	द० ४४·०
——	२ घटि	..	३८·८	द० ४५·१
——	१ घटि	..	२४·७	द० ४६·२
पर्वांतीं.	——		१०·६	द० ४७·३
पर्वांतानंतर	१ घटि	पूर्वेस	३·५	द० ४८·४
——	२ घटि	..	१७·६	द० ४९·५
——	३ घटि	..	३१·७	द० ५०·६

भूभा बिंबार्ध क० ४५·६, चंद्र बिंबार्ध. क० १६·७

मानैक्यखंड. ६२·३

आकृति काढण्याची तऱ्हा.

पहिल्यानें आपणास जेवढी धाकटी किंवा मोठी आकृति काढणें असेल त्याप्रमाणें स्केलाची योजना करावी. नंतर कागदावर एक आडवी रेख काढून तीस क्रांतिवृत्त ह्मणावें. या रेषेचे मध्यभागीं एक बिंदु घेऊन त्या सभोंवतीं वर भूभेची त्रिज्या दिली आहे (४५·६ कला) ती घेऊन त्या त्रिज्येनें वर्तुळ काढावें. त्याच मध्याभोंवतीं मानैक्यखंडानें आणखी एक वर्तुळ काढावें. कागदाचे चार बाजूंस चार दिशा उत्तर, पूर्व, दक्षिण आणि पश्चिम या घालाव्या. नंतर वर अंतरें दिलीं आहेत तीं पूर्व पश्चिम रेषेवर मध्यापासून ठेवावीं. या बिंदूवर लंब, शर दक्षिण उत्तर असेल त्याप्रमाणें खालीं वर काढावे व या लंबांवर शरांच्या क-

त्याप्रमाणें खालीवर बिंदु करावे. हे बिंदु चंद्राची घटिके घटिकेची विक्षेपवृत्तावरली स्थिति दाखवितात. हे बिंदु सांधून एक रेषा काढावी ती चंद्राचें विक्षेपवृत्त दाखवित्ये. या विक्षेपवृत्ताचे रेषेस, मानैक्यखंडाइतके त्रिज्येचे वर्तुळानें कोठें कापिलें आहे तें पाहावें ते बिंदु स्पर्श आणि मोक्ष यावेळच्या चंद्राचा स्थिति दाखवितात.


मागील उदाहरणांची जी आकृति काढली आहे तिजवरून असें समजतें कीं पर्वांतापूर्वी २ घ० १० प० या वेळेस त्या वर्तुळानें विक्षेपवृत्त कापिलें आहे आणि फिरून पर्वांतानंतर ३ घ० १५ प० या वेळेस कापिलें आहे. ह्मणून,

	घ०	प०			घ०	प०
पर्वांत ..	३८	१६				
स्पर्श ..	३८	१६	— २ .. १०	=	३६ ..	६
मोक्ष ..	३८	१६	+ ३ .. १५	=	४१ ..	३१

आतां या वेळा गणितागत काळाहून थोड्या वेगळ्या आहेत, परंतु गणित बरोबर व आकृति बरोबर काढली असली तर दोघांचेही वेळ जवळ जवळ येतात.

ग्रहणाचा मध्य ३८ घ० ४८ प० या वेळेस होतो. त्या वेळेस चंद्राची आकृति काढली आहे तीवर किती ग्रास झाला हें लागलेंच समजतें.

ग्रहण कोणते दिशेनें लागेल हें ही या आकृतीवरून लागलेंच समजतें.


चंद्रग्रहण
पौष शु॥१५ शके १७७२
उत्तर
दक्षिण
पूर्व
पश्चिम
क्रांतिवृत्त
क्षेपवृत्त
भू भा.
स्पर्श
मोक्ष
मध्य
चंद्र
पर्वांता पूर्वी
पर्वांतानंतर
स्केल
प. प.
पर्वांत. ३८.. १६
स्पर्श. २६.. ६
मध्य. ३८.. ४८
मोक्ष. ४१.. ३१

सूर्यग्रहण.

रवि आणि चंद्र यांचे कोष्टकांतून पर्वांतींचे, स्पष्टरवि, स्पष्ट-चंद्र, रविचंद्रांची स्पष्ट गति, चंद्राचा शर, रविचंद्रांचीं बिंबें व त्यांचीं लंबनें हीं सांधावीं.

नंतर रवींतून राहूस वजा करावा आणि त्या अंतराचा भूज जर १९ अंशांपेक्षां अधिक असला तर ग्रहण होणार नाहीं. १९ अंशांपेक्षां कमी व १३ अंशांपेक्षां अधिक असला तर ग्रहणाचा संभव, परंतु जर १३ अंशांपेक्षां कमी असला तर पृथ्वीवर सूर्यग्रहण कोठें तरी खचित होईल. इष्ट जागीं होईल किंवा नाहीं हे अजून सांगतां येत नाहीं.

आतां पर्वांता पूर्वींचे ५ घटिकांपासून पर्वांतानंतरच्या ५ घटिकापर्यंत प्रति घटिकेचें चंद्राचें लंबन व गति काढून त्यांचें संस्कार करून प्रति घटिकेचे लंबन संस्कृत चंद्र, नति संस्कृत शर, आणि चंद्राची लंबन संस्कृत गति हीं आणावीं.

नंतर लंबन संस्कृत चंद्रापासून लंबनसंस्कृत पर्वांत काढावा* आणि त्या वेळचा चंद्राचा नति संस्कृत शर आणावा.

आतां इष्ट स्थळीं ग्रहण होईल किंवा नाहीं हें पाहाणें.

रवि आणि चंद्र यांचे बिंबांचें मानैक्यखंड काढावें आणि मानांतरखंड काढावें. मानैक्यखंड नति संस्कृत शरापेक्षां अधिक असल्यास ग्रहण होईल, आणि मानांतरखंडही जर त्यापेक्षां अधिक असलें तर तें खग्रास किंवा कंकणाकृति होईल. रविबिंब चंद्रबिंबापेक्षां मोठें असल्यास कंकणाकृति लहान असल्यास खग्रास होईल.

* हें काम १५७ पेजावरले कोष्टकानें जलद होतें.

प्रतिघटकेचे चंद्राचे लंबन संस्कृत गतींतून सूर्याची प्रति घटिकेची गति वजा करावी आणि बाकीस चंद्राची विशिष्ट गति अशी संज्ञा द्यावी.

मानैक्यखंडांतून नति संस्कृत शर वजा करावा ह्मणजे ग्रास निघेल. यास ३ नीं भागलें ह्मणजे अंगुलात्मक ग्रास होईल.

चंद्राचा शर उत्तर असल्यास ग्रास उत्तर बाजूनें होईल. दक्षिण असल्यास दक्षिण बाजूनें होईल.

मानैक्यखंडांत नति संस्कृत शर मिळवून त्यास ग्रासानें गुणावें. या गुणाकाराचे वर्गमूळास विशिष्ट गतीनें भागावें. येईल ती स्पर्श किंवा मोक्ष स्थिति, ह्मणजे ग्रहण मध्यापासून स्पर्श किंवा मोक्षपर्यंत जो काळ तो. परंतु लंबन संस्कार रवीचे स्थितीप्रमाणें फिरतो यामुळें हा काळ शुद्ध येत नाहीं यास्तव वर काढलेले स्थितीचे काळाचें अर्ध करुन तेवढ्या वेळची पर्वांतीच्या अलीकडची व पलीकडची चंद्राची विशिष्ट गति काढावी आणि या गतीपासून वरील रीतीनें स्पर्श स्थिति आणि मोक्ष स्थिति यांची वेगळालीं मानें काढावी. ह्मणजे तीं बहुतकरुन फार स्पष्ट मानें येतील.

नंतर ग्रहण मध्यांतून स्पर्श स्थिति वजा करावी ह्मणजे स्पर्श काळ सांपडेल. आणि मोक्षस्थिति मिळवावी ह्मणजे मोक्षकाळ सांपडेल.

खग्रास किंवा कंकणाकृति ग्रहण असलें ह्मणजे मानांतर खंड व नति संस्कृत शर यांचे बेरजेस त्याचें वजाबाकीनें गुणावें. गुणाकाराचे वर्गमूळास चंद्राचे विशिष्ट गतीनें भागावें, भागाकार येईल तो एकदां ग्रहण मध्यांतून वजा केला ह्मणजे संमीलन काल येईल, मिळविला ह्मणजे उन्मीलन काल येईल.

सूर्य ग्रहणांत स्पर्श वगैरे पुढीलप्रमाणें होतात.

स्पर्श—		पश्चिमेकडून
मोक्ष—		पूर्वेकडून
कंकणाकृति	आरंभ.	पश्चिमेकडून
———	शेवट.	पूर्वेकडून.
खग्रास	आरंभ.	पूर्वेकडून
———	शेवट	पश्चिमेकडून

स्पर्श मोक्ष वगैरे होण्याचा दिशा चंद्रग्रहणांतील रीतीप्रमाणें काढाव्या.

वर सांगितलेली रिती चांगली लक्षांत यावी म्हणून पुढें एका ग्रहणाचें गणित करून दाखविलें आहे.

सूर्यग्रहण.

मुकाम मुंबई. शके १७६९ भाद्रपद वद्य ३०

		दि०	घ०
पर्वांत		१८१ .. २०	
यावेळचा	रा०	अं०	क०
स्पष्टरवि.	६ ..	१५ ..	२६·९
स्पष्ट चंद्र	६ ..	१५ ..	२७·२
स्पष्ट राहू.	६ ..	९ ..	२६·८
एकघटिकेची चंद्राची स्पष्ट गति.			११·८४
एक घटिकेची सूर्याची स्पष्ट गति.			०·९९
चंद्राचा स्पष्ट शर	उ.	० ..	३१·६
चंद्राचें क्षितिजस्थ स्पष्ट लंबन. ..			५४·२
चंद्रबिंब.			२९·६
रविबिंब.			३२·०
	रा०	अं०	क०
उदयिक क्षितिजस्थ विषुवांश.	६ ..	१७ ..	१·९

या ग्रहणाचे वेळीं ६ रा० १५ अं० इतका रवि आणि ६ रा० ९ अं० इतका केतू यांत अंतर ६ अंश आहे तेव्हां ग्रहण खचित होईल.

आतां सुमाराची लंबन संस्कृत तिथी करावयाची तेव्हां को० पत्र वे घेऊन.

		घ०
	पर्वांत	२०
दोनप्रहरांपासून पर्वांत ५ घटि० को० पत्र १५७ संस्कार		+३
	सुमाराची लं० सं० तिथी.—	२३

यावरून असें समजलें कीं ग्रहणमध्य सुमारानें २३ वे घटकेस होईल. ह्मणून यापासून ५ घटि मागेंपुढें घेऊन १८ घटिपासून २८ घटीपर्यंत गणित करावयाचें.

आतां पहिल्यानें या वेळीं चंद्रास लंबन संस्कार किती कितीं पडेल तो काढला पाहिजे. परंतु हें काढण्यास पहिल्यानें याम्योत्तर लग्न साधलें पाहिजे.

उदयकालीं विषुवांशभाग ६ रा० १७ अं० १'९ क० इतके आहेत ह्मणून वर दिलें आहे, तेथून पहिल्यानें १८ घटिकांनीं मध्यम रवींत १८ च कलांचा भेद आला आणि १२ राशींचा फेरा ६० घटिकांत होतो. तेव्हां १८ घटिकांत ३ राशी व १८ अंश इतके वर आले. ह्मणून १८ वे घटिकेस क्षितिजस्थ विषुवांशभाग इतके झाले.

	रा०	अं०	क०
उदयिक क्षितिजस्थ विषुवांशभाग.	६	१७	२
१८ घटींत वर आलेले अंश.	३	१८	०
१८ घटींत मध्यम रवीची गति	·	··	१८
१८ वे घटिकेस क्षितिजस्थ विषुवांशभाग	१०	५	२०
३ राशी वजाकरून याम्योत्तर विषुवांशभाग.	७	५	२०
को० पत्र १५१ संस्कार - -	+	२	२२
१८ वे घटिकेचें याम्योत्तर लग्न.	७	७	४२

याप्रमाणें दर घटिकेचें लग्नकाढून पुढील कोष्टक तयार केलें आहे. यावरून असें समजेल कीं एकदां एका घटिकेचें लग्न तयार झालें ह्मणजे पुढचा घटकांचे लग्नें काढण्यास फारशी पंचाईत पडत नाहीं.

याम्योत्तर लग्न.

उदयापासून काल.	क्षि. वि. भाग रा. अं. क.	याम्यो. वि. भाग. रा. अं. क.		संस्का. अं. क.	याम्यो. लग्न. रा. अं. क.
घटि. १८	१०.. ५..२०	७.. ५..२०	+	२..२२	७.. ७..४२
१९	११..२१	११..२१		२..२८	१३..४९
२०	१७..२२	१७..२२		२..२७	१९..४९
२१	२३..२३	२३..२३		२..२०	२५..४३
२२	२९..२४	२९..२४		२.. ७	८.. १..३१
२३	११.. ५..२५	८.. ५..२५		१..४८	७..१३
२४	११..२६	११..२५		१..२६	१२..५२
२५	१७..२७	१७..२७		१.. ०	१८..२७
२६	२३..२८	२३..२८		०..३२	२४.. ०
२७	२९.२९	२९..२९	+	०.. २	२९..३१

याप्रमाणें याम्योत्तर लग्न मिळाल्यावर त्यापासून क्रांतिवृत्ताचा अतिउच्च प्रदेश व त्याचे नतांश हे काढावे लागतात. हें काम सुलभ रीतीनें पत्र १५४–५५ वरचे कोष्टकांवरून करितां येतें. हें कोष्टक मुंबईकरितां तयार केलें आहे परंतु इतर अक्षांशावरील ठिकाण असल्यास तेंच काम १५८ व १५९ या पत्रांवर जीं कोष्टकें दिलीं आहेत या कोष्टकांवरून करितां येतें. आतां या कोष्टकांवरून फार सूक्ष्म काम होत नाहीं खरें परंतु दाहा पांच पळांच्या चुकींत ग्रहणाचे काळ बरोबर येतात.—

उदयापासून काल.	यांम्यो. लग्न. रा. अं. क.		संस्कार अं. क.		क्रां. अ. उ.प्र. रा. अं. क.	अ. उ. प्र. नतांश अं.
घटि १८	७..७ ..४२	—	११..५५	=	६..२५..४७	द.३१°०
१९	१३..४९		११..४९		७.. १..४०	३३°१
२०	१९..४९		११..२१		८..२८	३५°०
२१	२५..४३		१०..३४		१५.. ९	३६°६
२२	८.. १..३१		९..२८		२२.. ३	३८°५
२३	७..१३		८.. ४		२९.. ९	३९°८
२४	१२..५२		६..३१		६..२१	४०°९
२५	१८..२७		४..२७		१४.. ०	४१°७
२६	२४..०		२..२२		२१..३८	४२°२
२७	२९..३१	—	०..१२	=	८ २९..१९	४२°४

दर घटिकेचा क्रांतिवृत्ताचा अति उच्च प्रदेश व त्याचे नतांश आले. हा अति उच्च प्रदेश स्पष्ट रवींतून* वजा करून त्यापासून पत्र १५६ कोष्टकाचे आधारानें दर घटिकेचा लंबन संस्कार काढून तो चंद्रास दिला ह्मणजे दर घटिकेचा लंबन संस्कृत होतो त्यांतून स्पष्ट रवि वजा केला ह्मणजे त्यांचें अंतर येईल.

उदयापासून काल	लंबनसं० क०	स्पष्टचंद्र. रा०अं० क०	लं० स्प० चंद्र रा०अं०क०
घटि १८	— ९.२	६..१५.. २°६	६..१४.५४°२
१९	१३°९	१५°४	६.१५. १°५
२०	१७°८	२७°२	९°४
२१	२२°१	३९°०	१६°९
२२	२५°७	५०°८	२५°१
२३	२९°०	१६.. २°७	३३°७
२४	३२°०	१४°५	४२°५
२५	३४°६	२६°२	५१°७
२६	३६°४	३८°१	१६. १°७
२७	— ३८°४	४९°९	११°५

* चंद्राचें लंबन काढतांना वास्तवीकपणानें चंद्राचें अंतर क्रांतिवृत्ताच्या अति उच्च प्रदेशापासून काढलें पाहिजे परंतु ग्रहणकालीं रवि चंद्राजवळ असतो ह्मणून रवि घ्यावयास बरा पडतो.

याप्रमाणें लंबन संस्कृत चंद्र झाला. आतां याचें स्पष्ट रवीपासून अंतर खालीं दाखविलें आहे.

उदयापासून काल.		लंबन. संस्कृत चंद्र.			स्पष्टरवि	रवीपासून चंद्राचें अंतर
		रा०	अंश	क०	रा० अं०क.	क०
घटि.	१८	६ ..	१४ ..	५४·३	६.. १५ २४·९	८ पश्चिमेस ३०·६
	१९		१५ ..	१·५	२५·९	२४·४
	२०			९·४	२६·९	१७.५
	२१			१६·९	२७·९	११·०
	२२			२५·१	२८·९	३·८
	२३			३३·७	२९·९	पूर्वेस ३·८
	२४			४२·५	३०·९	११·६
	२५			५१·७	३१·९	१९·८
	२६	६	१६ ..	१·७	३२·९	२८·८
	२७			११·५	३३·९	३७·६

याप्रमाणें लंबन संस्कृत चंद्र आणि स्पष्ट रवि यांचें अंतर प्रति घटिकेचें मिळालें. यावरून असें समजतें कीं २२ घटकेस चंद्र ३·८ कला रवीचे पश्चिमेस होता परंतु २३ घटिकेस तोच ३·८ कला पूर्वेस आला. तेव्हां अनुमानानें असें झालें कीं तो २२ घ० ३० प० या वेळेस बरोबर होता. तेव्हां शुद्ध लंबन संस्कृत तिथी २२ घ० ३० प० आहे. तसेंच या अंतरांत एका घटिकेंत ७·६ कलांचा भेद आहे तेव्हां चंद्राची विशिष्ट नति ७·६ कला झाली.

आतां नति संस्कृत शर काढण्याचा. हें काम क्रांतिवृत्ताच्या अति उच्च प्रदेशाचे नतांशावरून १५६ वे पत्रावरचे कोष्टकाचे आधारानें होतें.

उदयापासून काल.		क्रां० अं० उ० प्र० नतांश	नति संस्कार	चंद्राचा स्पष्टशार	नति संस्कृत शार.
		अं०	क०	क०	क०
घटि.	१८	८० ३१·०	−२७·८	+२९·४	उ० +१·६
	१९	३३·१	−२९·४	३०·५	१·१
	२०	३५·०	−३१·१	३१·६	०·५
	२१	३६·६	−३२·६	३२·७	०·१

उदयापासून काल	क्रां.अं.उ.प्र. नतांश. अं०	नति. संस्कार क०	चंद्राचा स्पष्टशर	नति संस्कृत शर.
घटि. २२	द. ३८·५	− ३३·८	+ ३३·८	+ ०·०
२३	३९·८	− ३४·८	३४·९	०·१
२४	४०·९	− ३५·६	३६·०	०·४
२५	४१·७	− ३६·१	३७·१	१·०
२६	४२·२	− ३६·४	३८·२	१·८
२७	४२·४	− ३६·५	३९·३	२·८

मागें समज कीं रवि आणि लंबन संस्कृत चंद्र हे २२ घ० ३० प० यावेळेस सम कला होते. यावेळेस नति संस्कृत चंद्राचा शर वरील कोष्टकावरून − ०·१ होता असें येतें.

रविबिंब.	३२·०	३२·०	
चंद्रबिंब.	२९·६	२९·६	
मानैक्य.	६१·६	२·४	मानांतर
	३०·८	१·२	खंड

चंद्राचा शर ०·१ कला आहे. यापेक्षां मानैक्य आणि मानांतर ही दोन्ही खंडें अधिक आहेत आणि चंद्रबिंब रविबिंबापेक्षां लहान आहे तेव्हां हें ग्रहण कंकणाकृति होईल असें झालें.

आतां स्पर्श मोक्ष स्थिति काढण्याची तेव्हां मानैक्य खंड ३०·८ आहे यांत शर ०·१ मिळविला ह्मणजे बेरीज ३०·९ झाली यांचें अंतर ह्मणजे ग्रास ३०·७ झाला. यांचे गुणाकाराचे वर्गमुळास ७·६ (विशिष्ट गतीनें) भागिलें ह्मणजे ४ घ० ६ प० ही स्पर्श मोक्ष स्थिति झाली.

या ह्मुमाराचे स्थितीवरून स्पर्श मोक्ष स्थितींचीं वास्तवीक

मानें काढण्याकरितां ४ घ० ६ पळें यांचें निमें ह्मणजे २ घ० ३ प० या वेळा २२ घ० ३० पळांचें पूर्वी व नंतर घेतल्या ह्मणजे त्या वेळची चंद्राची विशिष्ट गति पुढील प्रमाणें येती.

२०॥ घटिके चंद्राची विशिष्ट गति. क० ६·५
२४॥ ———————— ८·२

या गति घेऊन ३०·९ आणि ३०·७ यांचे गुणाकाराचे वर्ग मुळास त्यांणीं भागलें ह्मणजे.

स्पर्श स्थिति ४ घ० ४४ पळें येती.
मोक्ष स्थिति ३ ·· ४२ — येती.

चंद्राचा शर फारच थोडा आहे याजकरितां ग्रहण मध्य २२ घ० ३० पळांसच होईल असें ह्मणावयास चिंता नाहीं ह्मणून

	घ० प०		घ० प०		घ० प०
स्पर्श	=२२··३०	—	४ ··४४	=	१७··४६
मोक्ष	=२२··३०	+	३ ··४२	=	२६··१२

आतां कंकण स्थिति काढण्याकरितां, मानांतर खंड १·२ आणि शर ०·१ यांची बेरीज १·३ आणि वजाबाकी १·१ यांचा गुणाकाराचे वर्ग मुळास चंद्राची विशिष्ट गति ७·५ यांणीं भागलें तर ० घ० ९ पळें हीं कंकण स्थिति झाली. याजकरितां

	घ० प०		घ० प०		घ० प०
कंकणारंभ	=२२··३०	—	०·· ९	=	२२··२१
कंकणांत	=२२··३०	+	०·· ९	=	२२··३९

आतां स्पर्श दिशा व मोक्ष दिशा काढण्याकरितां पुढील गणित केलें आहे.

०·१/३०८ = कोभु.	१ अंश. उ०		१ अंश उ०
क्रांतिवलन	२३ — द०		२३ — द०
अक्षवलन	८ — उ०		८ — उ०
स्पर्श दिशा.	१२ उ०	मोक्षदिशा	४० द०

गणिताचा सारांश.

मुका० मुंबई. सूर्यग्रहण.


शके १७६९ भाद्रपद व॥ ३०

	घ० प०	अ० मि०
स्पर्शकाल.	१७..४६	१..७
कंकणारंभ.	२२..२१	२..५६
ग्रहण मध्य.	२२..३०	३..०
कंकणांत	२२..३९	३..४
मोक्षकाल	२६..१२	४..२८
पर्वकाळ	८..२६	३..२१

ग्रहणाचा स्पर्श १२ अंश उत्तरेस होईल आणि मोक्ष ४० अंश दक्षिणेस होईल.

ग्रहणाची आकृति पुढील पत्रांत दाखविली आहे. आकृति काढण्याची तऱ्हा चंद्रग्रहणासारखीच आहे.

उदयापासून काल	रविपासून ☾चें अंतर	नति संस्कृत ☾चा शर		
घटि. १८	☾.प. ३०.६	उ. १.६	रवि बिंबार्ध	१६.०
१९	२४.४	१.१	चंद्र बिंबार्ध	१४.८
२०	१७.५	०.५	मानैक्य खंड	३०.८
२१	११.०	०.१		
२२	३.८	०.०		
२३	☾.पू. ३.८	०.१		
२४	११.६	१.०		
२५	१९.८	१.८		
२६	२८.८	२.८		
२७	३७.६	२.८		



	घ प.
स्पर्श	१८.०५
संमीलन	२२.२०
मध्यकाल	२२.३०
उन्मीलन	२२.४०
मोक्ष	२६.१०

सूर्यग्रहण

भाद्रपद वद्य ३० शके १७६९

कोष्टक.

सूर्याचें विपुवांशांपासून भोग काढण्याचे.

भोग = विपुवांश + याकोष्टकांतील संस्कार.

विपु० अंश	० रा० +	१ रा० +	२ रा० +	३ रा० -	४ रा० -	५ रा० -	विपु० अंश
अं०	अं० क०	अं० क०	अं० क०	अं० क०	अं० क०	अं० क०	अं०
०	० ०	२ ११	२ ५	० ०	२ ५	२ ११	३०
१	० ५	२ १४	२ ३	० ५	२ ८	२ ८	२९
२	० ११	२ १६	२ ०	० १०	२ ११	२ ५	२८
३	० १६	२ १८	१ ५७	० १५	२ १३	२ ३	२७
४	० २२	२ २०	१ ५४	० २०	२ १५	२ ०	२६
५	० २७	२ २१	१ ५०	० २५	२ १७	१ ५७	२५
६	० ३२	२ २३	१ ४७	० ३०	२ १९	१ ५३	२४
७	० ३७	२ २४	१ ४३	० ३४	२ २१	१ ५०	२३
८	० ४३	२ २५	१ ४०	० ३९	२ २२	१ ४६	२२
९	० ४८	२ २६	१ ३६	० ४४	२ २३	१ ४२	२१
१०	० ५३	२ २७	१ ३२	० ४९	२ २५	१ ३८	२०
११	० ५८	२ २८	१ २८	० ५३	२ २६	१ ३४	१९
१२	१ ३	२ २८	१ २४	० ५८	२ २७	१ ३०	१८
१३	१ ८	२ २८	१ २०	१ ३	२ २७	१ २६	१७
१४	१ १२	२ २८	१ १६	१ ७	२ २८	१ २२	१६
१५	१ १७	२ २८	१ ११	१ ११	२ २८	१ १७	१५
१६	१ २२	२ २८	१ ७	१ १६	२ २८	१ १२	१४
१७	१ २६	२ २७	१ ३	१ २०	२ २८	१ ८	१३
१८	१ ३०	२ २७	० ५८	१ २४	२ २८	१ ३	१२
१९	१ ३४	२ २६	० ५३	१ २८	२ २८	० ५८	११
२०	१ ३८	२ २५	० ४९	१ ३२	२ २७	० ५३	१०
२१	१ ४२	२ २३	० ४४	१ ३६	२ २६	० ४८	९
२२	१ ४६	२ २२	० ३९	१ ४०	२ २५	० ४३	८
२३	१ ५०	२ २१	० ३४	१ ४३	२ २४	० ३७	७
२४	१ ५३	२ १९	० ३०	१ ४७	२ २३	० ३२	६
२५	१ ५७	२ १७	० २५	१ ५०	२ २१	० २७	५
२६	२ ०	२ १५	० २०	१ ५४	२ २०	० २२	४
२७	२ ३	२ १३	० १५	१ ५७	२ १८	० १६	३
२८	२ ५	२ ११	० १०	२ ०	२ १६	० ११	२
२९	२ ८	२ ८	० ५	२ ३	२ १४	० ५	१
३०	२ ११	२ ५	० ०	२ ५	२ ११	० ०	०
	११ रा० -	१० रा० -	९ रा० -	८ रा० +	७ रा० +	६ रा० +	

कोष्टक

अक्ष वलन.

उपकरण, जागेचे अक्षांश आणि नतराशी.

नत राशी.				अक्षांश.								
				०	१०	२०	३०	४०	५०	६०	७०	८०
रा०	अं०	रा०	अं०	अं०	अं०	अं०	अं०	अं०	अं०	अं०	अं०	अं०
०	०	६	०	०	०	०	०	०	०	०	०	०
०	१०	६	१०	०	२	३	५	६	८	९		
०	२०	६	२०	०	३	७	१०	१२	१५	१८		
१	०	७	०	०	५	१०	१५	१९	२३	२६		
१	१०	७	१०	०	६	१३	१८	२४	३०	३४		
१	२०	७	२०	०	७	१६	२२	२९	३६	४२		
२	०	८	०	०	८	१८	२५	३४	४२	४९		
२	१०	८	१०	०	९	१९	२८	३७	४६	५५		
२	२०	८	२०	०	१०	२०	२९	३९	४९	५८		
३	०	९	०	०	१०	२०	३०	४०	५०	६०		
३	१०	९	१०	०	१०	२०	२९	३९	४९	५८		
३	२०	९	२०	०	९	१९	२८	३७	४६	५५		
४	०	१०	०	०	८	१८	२५	३४	४२	४९		
४	१०	१०	१०	०	७	१६	२२	२९	३६	४२		
४	२०	१०	२०	०	६	१३	१८	२४	३०	३४		
५	०	११	०	०	५	१०	१५	१९	२३	२६		
५	१०	११	१०	०	३	७	१०	१२	१५	१८		
५	२०	११	२०	०	२	३	५	६	८	९		
६	०	१२	०	०	०	०	०	०	०	०		

कोष्टक

क्रांति वलन.

उपकरण सायन रवी.

	० रा०		१ रा०		२ रा०		३ रा०		४ रा०		५ रा०		
अं०	अं०	क०	अं०	क०	अं०	क०	अं०	क०	अं०	क०	अं०	क०	अं०
०	२३	२८	२०	३६	१२	१५	०	०	१२	१५	२०	३६	३०
१	२३	२८	२०	२५	११	५३	०	२६	१२	३६	२०	४७	२९
२	२३	२७	२०	१३	११	३१	०	५२	१२	५७	२०	५८	२८
३	२३	२६	२०	०	११	९	१	१८	१३	१८	२१	९	२७
४	२३	२५	१९	४७	१०	४७	१	४४	१३	३९	२१	१९	२६
५	२३	२३	१९	३४	१०	२४	२	१०	१३	५९	२१	२९	२५
६	२३	२१	१९	२१	१०	१	२	३६	१४	१९	२१	३८	२४
७	२३	१९	१९	७	९	३८	३	२	१४	३९	२१	४७	२३
८	२३	१६	१८	५३	९	१४	३	२७	१४	५८	२१	५६	२२
९	२३	१३	१८	३८	८	५१	३	५३	१५	१७	२२	४	२१
१०	२३	९	१८	२४	८	२७	४	१९	१५	३६	२२	१२	२०
११	२३	५	१८	८	८	३	४	४४	१५	५४	२२	१९	१९
१२	२३	०	१७	५३	७	३८	५	९	१६	१२	२२	२६	१८
१३	२२	५५	१७	३६	७	१४	५	३५	१६	३०	२२	३३	१७
१४	२२	५०	१७	२०	६	४९	६	०	१६	४७	२२	३९	१६
१५	२२	४५	१७	४	६	२५	६	२४	१७	४	२२	४५	१५
१६	२२	३९	१६	४७	६	०	६	४९	१७	२०	२२	५०	१४
१७	२२	३३	१६	३०	५	३५	७	१४	१७	३६	२२	५५	१३
१८	२२	२६	१६	१२	५	९	७	३८	१७	५३	२३	०	१२
१९	२२	१९	१५	५४	४	४४	८	३	१८	८	२३	५	११
२०	२२	१२	१५	३६	४	१९	८	२७	१८	२४	२३	९	१०
२१	२२	४	१५	१७	३	५३	८	५१	१८	३८	२३	१३	९
२२	२१	५६	१४	५८	३	२७	९	१४	१८	५३	२३	१६	८
२३	२१	४७	१४	३९	३	१	९	३८	१९	७	२३	१९	७
२४	२१	३८	१४	१९	२	३६	१०	१	१९	२१	२३	२१	६
२५	२१	२९	१३	५९	२	१०	१०	२४	१९	३४	२३	२३	५
२६	२१	१९	१३	३९	१	४४	१०	४७	१९	४७	२३	२५	४
२७	२१	९	१३	१८	१	१८	११	९	२०	०	२३	२६	३
२८	२०	५८	१२	५७	०	५२	११	३१	२०	१३	२३	२७	२
२९	२०	४७	१२	३६	०	२६	११	५३	२०	२५	२३	२८	१
३०	२०	३६	१२	१५	०	०	१२	१५	२०	३६	२३	२८	०
	११ रा०		१० रा०		९ रा०		८ रा०		७ रा०		६ रा०		

क्रांतिवृत्ताचा अतिउच्च प्रदेश काढण्याकरितां संस्कार.

उपकरण= सायन त्रिभोन लग्न. क्रांतिवृ.अ.उ.प्र.= सा.त्रि.ल ±याको.

अंक	रा० ३ +	रा० ४ ±	रा० ५ −	रा० ६ −	रा० ७ −	रा० ८ −	
	क० वि०	क० वि०	क० वि०	क० वि०	क० वि०	क० वि०	
०	० ०	० १६	२ ३८	७ ४६	११ ४०	९ ४७	३०
१	० २	० १४	२ ४६	७ ५७	११ ४४	९ ३४	२९
२	० ४	० १२	२ ५५	८ ७	११ ४७	९ २१	२८
३	० ६	० ९	३ ४	८ १७	११ ४९	९ ७	२७
४	० ८	० ६	३ १४	८ २८	११ ५१	८ ५३	२६
५	० १०	० २	३ २४	८ ३८	११ ५३	८ ३८	२५
६	० १२	० १	३ ३४	८ ४८	११ ५४	८ २३	२४
७	० १४	० ५	३ ४४	८ ५७	११ ५५	८ ७	२३
८	० १६	० ९	३ ५४	९ ६	११ ५५	७ ५०	२२
९	० १८	० १४	४ ४	९ १६	११ ५५	७ ३२	२१
१०	० १९	० १९	४ १४	९ २५	११ ५५	७ १४	२०
११	० २१	० २४	४ २५	९ ३४	११ ५४	६ ५६	१९
१२	० २२	० २९	४ ३५	९ ४३	११ ५३	६ ३७	१८
१३	० २३	० ३४	४ ४६	९ ५२	११ ५१	६ १८	१७
१४	० २४	० ३९	४ ५६	१० १	११ ४८	५ ५९	१६
१५	० २५	० ४५	५ ६	१० ९	११ ४४	५ ३९	१५
१६	० २५	० ५१	५ १६	१० १८	११ ४०	५ १९	१४
१७	० २६	० ५७	५ २७	१० २६	११ ३६	४ ५८	१३
१८	० २७	१ ३	५ ३८	१० ३३	११ ३१	४ ३७	१२
१९	० २७	१ १०	५ ४९	१० ४०	११ २६	४ १५	११
२०	० २७	१ १७	६ ०	१० ४७	११ २०	३ ५३	१०
२१	० २७	१ २४	६ १०	१० ५४	११ १४	३ ३१	९
२२	० २६	१ ३१	६ २१	११ ०	११ ७	३ ८	८
२३	० २६	१ ३९	६ ३२	११ ६	१० ५९	२ ४५	७
२४	० २५	१ ४७	६ ४३	११ १२	१० ५०	२ २२	६
२५	० २४	१ ५५	६ ५३	११ १८	१० ४१	१ ५८	५
२६	० २३	२ ३	७ ४	११ २४	१० ३२	१ ३५	४
२७	० २२	२ १२	७ १४	११ २९	१० २२	१ १२	३
२८	० २०	२ २०	७ २५	११ ३३	१० ११	० ४८	२
२९	० १८	२ २९	७ ३६	११ ३७	९ ५९	० २४	१
३०	० १६	२ ३८	७ ४६	११ ४०	९ ४७	० ०	०
	रा० २ −	-रा० १ ∓	रा० ० +	रा० ११ +	रा० १० +	रा० ९ +	

क्रांतिवृत्ताचे अत्युच्चप्रदेशाचे नतांश.
उपकरण. सायन त्रिभोन लग्न.

	रा० ३	रा० ४	रा० ५	रा० ६	रा० ७	रा० ८	
	क० वि०	क० वि०	क० वि०	क० वि०	क० वि०	क० वि०	
०	४ ३३	१ १५	६ ५७	१७ १८	२८ १७	३८ ३	३०
१	४ ३३	१ २	७ १६	१७ ४०	२८ ३९	३८ १९	२९
२	४ ३२	० ४९	७ ३५	१८ २	२९ १	३८ ३४	२८
३	४ ३१	० ३६	७ ५५	१८ २४	२९ २२	३८ ४९	२७
४	४ ३०	० २२	८ १५	१८ ४६	२९ ४३	३९ ४	२६
५	४ २८	० ८	८ ३५	१९ ८	३० ४	३९ १८	२५
६	४ २५	० ६	८ ५५	१९ ३०	३० २५	३९ ३२	२४
७	४ २२	० २१	९ १५	१९ ५२	३० ४६	३९ ४५	२३
८	४ १९	० ३६	९ ३५	२० १४	३१ ७	३९ ५८	२२
९	४ १५	० ५१	९ ५५	२० ३६	३१ २८	४० १०	२१
१०	४ ११	१ ७	१० १५	२० ५८	३१ ४९	४० २२	२०
११	४ ५	१ २३	१० ३५	२१ २०	३२ १०	४० ३३	१९
१२	४ ०	१ ३९	१० ५५	२१ ४२	३२ ३१	४० ४४	१८
१३	३ ५४	१ ५५	११ १६	२२ ४	३२ ५१	४० ५४	१७
१४	३ ४८	२ ११	११ ३७	२२ २६	३३ ११	४१ ४	१६
१५	३ ४१	२ २७	११ ५८	२२ ४८	३३ ३१	४१ १३	१५
१६	३ ३४	२ ४४	१२ १९	२३ १०	३३ ५१	४१ २२	१४
१७	३ २६	३ १	१२ ४०	२३ ३२	३४ ११	४१ ३०	१३
१८	३ १८	३ १८	१३ १	२३ ५४	३४ ३०	४१ ३८	१२
१९	३ १०	३ ३५	१३ २२	२४ १६	३४ ४९	४१ ४५	११
२०	३ २	३ ५३	१३ ४३	२४ ३८	३५ ८	४१ ५२	१०
२१	२ ५३	४ ११	१४ ४	२५ ०	३५ २७	४१ ५८	९
२२	२ ४४	४ २९	१४ २५	२५ २२	३५ ४५	४२ ३	८
२३	२ ३४	४ ४७	१४ ४६	२५ ४४	३६ ३	४२ ८	७
२४	२ २४	५ ५	१५ ८	२६ ६	३६ २१	४२ १२	६
२५	२ १३	५ २३	१५ ३०	२६ २८	३६ ३९	४२ १६	५
२६	२ २	५ ४१	१५ ५१	२६ ५०	३६ ५६	४२ १९	४
२७	१ ५१	६ ०	१६ १२	२७ १२	३७ १३	४२ २१	३
२८	१ ३९	६ १९	१६ ३४	२७ ३४	३७ ३०	४२ २२	२
२९	१ २७	६ ३८	१६ ५६	२७ ५६	३७ ४७	४२ २३	१
३०	१ १५	६ ५७	१७ १८	२८ १७	३८ ३	४२ २३	०
	रा० २	रा० १	रा० ०	रा० ११	रा० १०	रा० ९	

कोष्टक

नती व लंबन संस्कार.

क्रांतिवृत्ताचे अतिउच्चस्थानांतून सूर्य वजाकरून जे अंतर अंश
तील ते आणि क्रांतिवृत्ताचे अत्युच्च स्थानाचे नतांश यांपासून नती व लं
हीं काढणें.

क्रां. वृ. चे अ. उ. न आणि सा. न रवी यांचे अंतर.		क्रांतिवृत्ताचे अतिउच्चस्थानाचे नतांश.								
		०	५	१०	१५	२०	२५	३०	३५	४०
रा०	अं०	क०	क०	क०	क०	क०	क०	क०	क०	क०
०	०	०	०	०	०	०	०	०	०	०
	५	५·२	५·२	५·१	५·०	४·९	४·७	४·५	४·३	४·०
	१०	१०·४	१०·४	१०·३	१०·१	९·८	९·५	९·०	८·६	[illegible]
	१५	१५·५	१५·५	१५·३	१५·०	१४·६	१४·१	१३·४	१२·७	११·८
	२०	२०·५	२०·४	२०·२	१९·८	१९·३	१८·६	१७·८	१६·८	१५·७
	२५	२५·४	२५·३	२५·१	२४·६	२३·९	२३·०	२२·०	२०·८	१९·५
१	०	३०·०	२९·९	२९·६	२९·०	२८·२	२७·१	२६·०	२४·५	२३·०
	५	३४·४	३४·३	३३·९	३३·३	३२·३	३१·१	२९·८	२८·२	२६·३
	१०	३८·६	३८·५	३८·१	३७·३	३६·२	३५·०	३३·४	३१·६	२९·४
	१५	४२·४	४२·२	४१·८	४१·०	३९·८	३८·४	३६·७	३४·७	३२·३
	२०	४५·९	४५·७	४५·३	४४·४	४३·१	४१·६	३९·७	३७·६	३५·०
	२५	४९·१	४८·९	४८·४	४७·५	४६·२	४४·५	४२·५	४०·१	३७·५
२	०	५१·९	५१·७	५१·२	५०·२	४८·८	४७·०	४५·०	४२·५	३९·७
	५	५४·४	५४·२	५३·६	५२·६	५१·१	४९·३	४७·०	४४·५	४१·६
	१०	५६·४	५६·२	५५·६	५४·५	५३·०	५१·१	४८·८	४६·२	४३·१
	१५	५८·०	५७·८	५७·२	५६·१	५४·५	५२·६	५०·२	४७·५	४४·४
	२०	५९·१	५८·८	५८·२	५७·१	५५·६	५३·६	५१·२	४८·४	४५·३
	२५	५९·७	५९·४	५८·८	५७·७	५६·२	५४·२	५१·७	४८·९	४५·७
३	०	६०·०	५९·७	५९·१	५८·०	५६·४	५४·४	५१·९	४९·१	४५·९
नती.—		०	५·२	१०·४	१५·५	२०·५	२५·४	३०·०	३४·४	३८·६

नती काढतांना अंतर राशींची गरज नाहीं, क्रांतिवृत्ताचे अतिउच्चप्र-
देशांचे उन्नतांशापासून काढतां येती.

जेव्हां चंद्राचे परम लंबन ६० कला आहे तेव्हां हे कोष्टक खरें, लंबन
६० कलांपेक्षां कमी असल्यास खरा संस्कार त्रैराशिकानें आणावा.

सुमारानें लंबन संस्कृत तिथि काढण्याचें कोष्टक.

ज्यावेळेस सूर्य याम्योत्तरेवर येतो त्यावेळेपासून पर्वांतापर्यंत कितीकाळ जातो तो पाहावा आणि त्याप्रमाणें पुढील कोष्टकांतून संस्कार काढावा.

याम्योत्तरेचे सूर्य पूर्वेस असल्यास हा संस्कार पर्वांतांत ऋण करावा आणि पश्चिमेस असल्यास धन करावा.

याम्योत्तरे पासून काल.	संस्कार. घ०	संस्कार. प०	याम्योत्तरे पासून काल.	संस्कार. घ०	संस्कार. प०
१	१	०	९	४	३०
२	१	५०	१०	४	३०
३	२	४०	११	४	३०
४	३	२०	१२	४	३०
५	३	४०	१३	४	३०
६	४	०	१४	४	२०
७	४	२०	१५	४	२०
८	४	३०			

सूर्य ग्रहण करितांना ही सुमाराची लंबन संस्कृत तिथि काढावी लागते.

कोष्टक.

पाहिजे त्या अक्षांशांवरचा क्रांतिवृत्ताचा अति उच्च प्रदेश काढण्याचा उपकरणीं. जागेचे अक्षांश, आणि याम्योत्तरेचे विषुवांश.

कां. अ, उ. प्रदेश = या. वि. ± या कोष्टकांतील संस्कार.

याम्योत्तरेचे विषुवांशा चा राशी.	उत्तर अक्षांश.								
	०	५	१०	१५	२०	२५	३०	३५	४०
रा०	रा०	रा०	रा०	रा०	रा०	रा०	रा०	रा०	रा०
०	०	२	४	६	८	११	१३	१६	१८
१	– २	०	१	३	५	७	८	१०	१२
२	– २	– १	०	१	२	३	४	५	६
३	०	०	०	०	०	०	०	०	०
४	२	१	०	– १	– २	– ३	– ४	– ५	– ६
५	२	०	– १	– ३	– ५	– ७	– ८	–१०	–१२
६	०	– २	– ४	– ६	– ८	–११	–१३	–१६	–१८
७	– २	– ४	– ६	– ९	–११	–१४	–१६	–१९	–२२
८	– २	– ४	– ५	– ७	– ९	–११	–१२	–१५	–१८
९	०	०	०	०	०	०	०	०	०
१०	२	४	५	७	९	११	१२	१५	१८
११	२	४	६	९	११	१४	१६	१९	२२
१२	०	२	४	६	८	११	१३	१६	१८

कोष्टक.

पाहिजे त्या अक्षांशांवर, क्रांतिवृत्ताचे अतिउच्च प्रदेशाचे नतांश काढण्याचे. उपकरण. जागेचे अक्षांश, आणि याम्योत्तरेचे विषुवांश.

क्रां. अ. उ. प्र. नतांश = कोष्टकांतील अंश.

याम्योत्तरेचे विषुवांशाचा राशी.	उत्तर अक्षांश.								
	०	५	१०	१५	२०	२५	३०	३५	४०
रा०									
०	+०	- ५	- ९	-१४	-१८	-२३	-२७	-३२	-३६
१	१२	+८	+३	- २	- ७	-१२	-१७	-२२	-२६
२	२०	१५	१०	+५	०	- ५	-१०	-१५	-१९
३	२३	१८	१३	८	+३	- २	- ७	-१२	-१७
४	२०	१५	१०	५	०	- ५	-१०	-१५	-१९
५	१२	+८	३	- २	७	-१२	-१७	-२२	-२६
६	०	- ५	- ९	-१४	-१८	-२३	-२७	-३२	-३६
७	-१२	-१७	-२१	-२६	-३०	-३५	-३९	-४३	-४८
८	-२०	-२५	-३०	-३५	-३९	-४४	-४९	-५४	-१८
९	-२३	-२८	-३३	-३८	-४३	-४८	-५३	-५८	-६३
१०	-२०	-२५	-३०	-३५	-३९	-४४	-४९	-५४	-५८
११	-१२	-१७	-२१	-२६	-३०	-३५	-३९	-४३	-४८
१२	०	- ५	- ९	-१४	-१८	-२३	-२७	-३२	-३६

+ ह्म० उत्तर — ह्म० दक्षिण.

स्पष्ट तिथि साधन.

कालसाधन कोष्टकांचे आधारानें जी तिथि येते ती सुमाराची येते. परंतु ती बरोबर करणें झाल्यास पुढील रीतीनें स्पष्टचंद्र व स्पष्ट रवि यांपासून साधतां येती.

१ जी तीथ करावयाची असेल ती कालसाधन कोष्टकांनीं सुमाराची साधून त्या दिवशींचे प्रातःकाळचे रवि आणि चंद्र हे स्पष्ट करावे, आणि त्यांच्या स्पष्ट गतिही आणाव्या.

२ नंतर स्पष्ट सूर्य स्पष्ट चंद्रांतून वजा करावा. बाकी राहील तिचे अंश करावे आणि त्यांस १२ नीं भागावें. भागाकार येईल तितक्या गततिथि झाल्या. बाकी राहील तितके अंश पुढील तिथीचे भुक्तांश झाले. आणि ते १२ अंशांतून वजा केल्यानें भोग्यांश येतात. नंतर या भोग्यांशांस ६० घटिकांनीं गुणावें आणि रवि चंद्रांच्या स्पष्ट गतींच्या वजाबाकीनें भागावें. जो भागाकार येईल तितक्या घटिका अजून भोगण्याच्या राहिल्या असें समजावें.

उदा० शके १७७२ कार्तिक शुद्ध ५ मीचे दिवशीं प्रातःकाळीं स्पष्ट रवि ७ रा० १६ अं० १८'९ क० होता, स्पष्ट चंद्र ९ रा० १४ अं० ३६'३ क० होता, रवीची स्पष्ट गति ६०'३ कला होती, आणि चंद्राची स्पष्ट गति ७१८'२ कला होती; तर यांपासून वास्तविक पंचमी कोठपर्यंत असेल तें सांग?

	रा०	अं०	क०		क०	
स्पष्ट चंद्र.	९ ..	१४ ..	३६·३	स्पष्ट गति	७१८·२	८
स्पष्ट रवि.	७ ..	१६ ..	१८·९	स्पष्ट गति	६०·३	०
अंतर	१ ·	२८ ·	१७·४		६५७·९	
१२)		५८ ·	१७·४			

गततिथि ४ शेष १० .. १७·४ मुक्तांश
१२
बाकी १ · ४२·६ भोग्यांश
=१०२·६ कला

त्रिराशिकानें

क० घ० क०
६५७·९ : ६० :: १०२·६
६०
घ० प०
६५७·९) ६१५६·० (९ .. २१

यावरून ५ मी ९ घ० २१ प० भोगण्याची राहिली आहे असें झालें. कालसाधन कोष्टकानें १२ घ० १२ प० येतात.

करण.

गततिथि असतील त्यांस २ नीं गुणून ७ नीं भागावें. भाग सोडून बाकी राहील ती मात्र घ्यावी. नंतर या बाकीच्या अंकांप्रमाणें बव करणापासून क्रमानें मोजावें. जो करण येईल तो तिथीचा पूर्वार्धाचा समजावा. त्यांत १ मिळविला तर उत्तरार्धाचा येतो. दर तिथींत २ करण असतात

तिथीच्या भुक्त आणि भोग्य घटिकांचे बेरजेस दोहोंनीं भागावें आणि त्यांतून तिथीच्या भुक्त घटी वजा कराव्या म्हणजे अर्धा करणाच्या भोग्य घटिका येतात.

आणखी या करणांत कांही करण स्थिर आहेत त्यांची नांवं.

कृष्ण चतुर्दशी उत्तरार्ध······ शकुनी करण.

कृष्ण अमावास्या पूर्वार्ध···· चतुष्पद करण

··········उत्तरार्ध···· नाग करण

शुद्ध प्रतीपदा, पूर्वार्ध······ किंस्तुघ्न करण

करणांची नांवें व क्रम. १ बव, २ बालव ३ कौलव, ४ तैतिल, ५ गर, ६ वणिज, ७ भद्रा, अथवा विष्टी अथवा कल्याणी.

हे हिंदू पंचांगांत दिले असतात ह्मणून ते कसे काढतात ते दाखविण्यासाठीं ही रीति आह्मीवर दिली आहे. हे करण आकाशांतील ग्रहांची कोणती स्थिति दाखवितात हें कांहीं समजत नाहीं. यांचा उपयोग फल ग्रंथास मात्र आहे.

नक्षत्र साधन.

क्रांतिवृत्ताचे १२ भाग केले ह्मणजे प्रत्येकास राशि ह्मणतात, तसें त्याचे २७ भाग केले ह्मणजे प्रत्येकास नक्षत्र ह्मणतात. चंद्राचें नक्षत्र काढतांना हे भाग निरयन करावे लागतात. हिंदू लोकांचे सर्व ग्रह साधारणपणानें निरयन असतात.

अयन गति प्रति वर्षी ५०·१ विकला आहे परंतु भास्कराचार्य आदी करून निर्निराळे ज्योतिषी हि गति निर्निराळी मानितात. ग्रहलाघव ह्मणजे ज्या ग्रंथावरून हिंद्वी पंचांग तयार होतें, त्या ग्रंथांत ही गति ६० विकला ह्मणजे १ कला मानली आहे. ही गणित सुलभहोण्याकरतां सोइवार धरली गेली आहे खरी परंतु कसर थोडी थोडी करतां आजही कसर ४ अंश जमली आहे आणि त्यामुळें सर्व संक्रांती ही ४ दिवस वास्तवीक वेळेचे मागून होत आहेत. असो, हिंदु लोकांप्रमाणें शके ४४४

अयनांश शून्य होते. तऱ्ही दरवर्षास १ कला यारितीनें शके १७७२ ह्मणजे १३२८ वर्षांनीं अयनांश २२ अं० ८ क० होतील.

नक्षत्र काढण्याची रीति.

निरयन स्पष्ट चंद्रास कलात्मक करावा आणि त्या कलांस ८०० नीं भागावें. भागाकार येईल तितकीं गत नक्षत्रें. बाकीस ८०० शांतून वजा देऊन बाकी राहील तें भोग्य नक्षत्र असें समजावें. नंतर भोग्य कलांस ६० नीं गुणून त्यांस चंद्राचे स्पष्टगतीनें भागावें भागाकार येईल तितक्या भोग्य घटिका आहेत असें समजावें.

उदा० स्पष्टचंद्र सायन ९ रा० १४ अं० २६·२ क० आहे स्पष्ट गति ७१८·२ आहे. नक्षत्र कोणतें तें सांगावें..

	रा०	अं०	क०
सायन चंद्र	९..	१४..	२६·२
अयनांश...		२२..	८
निरयन चंद्र.	८	२२..	२८·२
अंश	२६२	२..	२८·२
कला			१५७४८·२

८००) १५७४८.२

गतनक्षत्रें १९ बाकी ५४८·२ भुक्तकला

८००.

२५१·७. भोग्यकला

६० घ० प०

७३८·२) १५१०२·० (२१..१६

ह्मणजे १९ नक्षत्रें जाऊन २० वें नक्षत्र (पूर्वाषाढा) २१ घ० १६ प० पर्यंत भोगण्याचें आहे.

निरयन स्पष्ट रवि आणि स्पष्ट चंद्र यांचा योग करून, त्या बेरजेच्या कला कराव्या आणि त्यांस ८०० नीं भागावें. जो भागाकार येईल तितके योग भोगून गेले, बाकी राहील तितक्या कला पुढील योगाच्या भोगण्याचा राहिल्या आहेत असें समजावें. नंतर या कलास ६० नीं गुणावें आणि रवि व चंद्र याच्या स्पष्ट गतींच्या बेरजेच्या कलांनीं भागावें ह्मणजे भोग्य घटिका येतील.

उदाहरण. स्पष्ट चंद्र ९ रा० १४ अं० ३६·३ क० आणि स्पष्ट रवि ७ रा० १६ अं० १८·९ क०— रवीची स्पष्ट गति ६०·३ कला, चंद्र गति ७१८·२ कला, योग साधण्याचा.

	रा०	अं०	क०		
स्पष्टचंद्र	९ ..	१४ ..	३६·३	☾ गति.	७१८·२
स्पष्टरवि	७ ..	१६ ..	१८·९	☉ –	६०·३
	५	३०	५५·२		७७८·५
		१५	५५·२		
(८००) कला			९०५५·२		
गतयोग		११	बाकी	२५५·२ मुक्तकला.	
				६०	घ० प०
			७७८·५)	१५३१२·०	(१९ ३९

यावरून असें झालें कीं ११ योग भोगून १२ योग ह्मणजे वृद्धियोग १९ घ० ३९ प० भोगण्याचा राहिला.

ग्रह कोष्टक.

सूचना.

मागें रवि चंद्र यांचे कोष्टक दिले, आहेत, त्यांवरून ते ग्रहस्पष्ट कसे करावे व त्यांपासून ग्रहण, तीथ वगैरे हीं कशीं साधावीं हेंही सांगितलें. आतां बुध, शुक्र इत्यादि ग्रहांचे कोष्टकांविषयीं कांहीं सांगितलें पाहिजे.

ह्या पुस्तकांत बुध, शुक्र, मंगळ गुरु आणि शनि इतक्यांचें मात्र कोष्टक दिले आहेत. आलिकडे, हर्शल, नेपूच्यून, वेस्ता, जूनो वगैरे जे नवेग्रह सांपडले आहेत त्यांचीं कोष्टकें दिलीं नाहींत; याचें कारण असें आहे कीं, हिंदूंस त्यांची माहिती नाहीं, व माहिती झाली तरी ते इतके लाहान आहेत कीं चांगलीं यंत्रें आणि मोठाल्या दुर्बिणी यांचे साहाय्याशिवाय ते दिसत नाहींत.

पुढें हिंदूलोक मोठ मोठाले वेध कर्ते झाले आणि या गोष्टींकडे विशेष लक्ष देऊं लागले ह्मणजे ह्या ग्रंथांतील कोष्टकांपेक्षां उत्तम प्रतीचीं कोष्टकें ते छापतील आणि नवीन शोधलेले ग्रह व हल्लीं विलायतेंत आकाशांतील जडांविषयीं जे अद्भुत चमत्कार पाहाण्यांत आले आहेत त्या सर्वांची माहिती करून घेतील. सध्या आमचा हेतु इतकाच आहे कीं या पुस्तकांतील कोष्टकें खरीं असें त्यांच्या अनुभवास येऊन या गोष्टींकडे त्यांचें लक्ष लागावें, आणि आपल्या कोष्टकांत व मतांत किती भेद पडतो आहे तो पाहावा.

हिंदूंची मेष संक्रांत शके १७०० या वर्षी ज्यावेळेस झाली, त्यावेळची बुध शुक्र इत्यादि ग्रहांच्या इंग्रजी गणिताप्रमाणें ज्या स्थिति आल्या आहेत त्या खालीं दाखविल्या आहेत.

सायन मान.

	मध्यम ग्रह.	उच्च	क्षेप पात.
	रा·अं·क·वि·	रा·अं·क·वि·	रा·अं·क·वि·
बुध ——	१·३·३३·५६.	८·१४.०.२९·	१·१५·४१·७
शुक्र ——	१·१·१८·५४.	१०.८.१८.२६.	२.१४.४०..५४
मंगळ ——	१·३·५१.३८.	५·१·५९·१·	१·१७·५१.७
गुरु ——	४·२२·९·२·	६·१०.४७.४९.	३·८·११.११
शनि ——	७·७·१५.४९.	८.२८.४०.१५·	३·२१.४५.१४

या ग्रहांचा एका भगणाचा (रविमध्य धरून) काल; त्यांचीं रवीपासून मध्यम अंतरें, ह्मणजे मध्यम मंद कर्ण; कक्षा केंद्रच्युति; कक्षावृत्ताचें क्रांतिवृत्ताशीं तिर्यग्त्व; इत्यादि गोष्टी पुढील कोष्टकांत दिल्या आहेत.

ग्रहांचे भगणकाल वगैरे.

ग्रहांचीं नांवें	एका भगणाचा काल	मध्यम मंदकर्ण	कक्षा केंद्रच्युति	परम मंदफल संस्कार	कक्षावृत्तावें क्रांतिवृत्ताशीं तिर्यग्त्व	उच्चाची वर्षगति, सायन	कक्षापाताची वर्षगति सायन
	दिवस			अं क	अं क वि	विकला	विकला
बुध	८७·९६९	०· ३८७१	०· ०७९५	२३·४०	७· ०· ०	५६·२	४३·३
शुक्र ..	२२४·७०१	०· ७२३३	· ००५०	०·४७	३·२३·३५	४८·६	३१·०
मंगळ ..	६८६·९८०	१· ५२३७	· १४२०	१०·४२	१·५१· ३	६७·०	२७·३
गुरु	४३३२·५८६	५· २०२७	· २५०२	५·३०	१·१९· २	५६·७	३५·७
शनि ..	१०७५९·२२०	९· ५३८८	· ५३६१	६·२६	२·२९·५५	६६·१	३१·७

भाग रवि व चंद्र ह्यांचीं कोष्टकें दिलीं त्यांत व पुढे बुध आ-
दि करून दुसरे ग्रहांचीं कोष्टकें दिलीं आहेत त्या सर्वांत ते ग्रह सायन दिले आहेत परंतु आपणास निरयन करणे झाल्यास त्यांतून अयनांश वजा करावे लागतात.

ग्रह लाघवांत शून्य अयनांश शके ४४४ ह्यांत होते असें मानलें आहे. परंतु रेवति नक्षत्राचा योगतारा जर निरयन ग्रह मोजण्याचा आरंभ असें मानलें तर रेवती नक्षत्र संपातांत शके ४९६ वांत होतें, ह्मणून अयनांश काढतांना ४९६ धरावे हें बरें. अयनांशांची गति सर्व कोष्टकांचे शेवटीं दिली आहे, त्यावरून पाहिजे त्या वर्षीचे अयनांश काढतां येतील.

ग्रहाचे विषुवांश व क्रांति काढण्याचे कोष्टक व ग्रहयुति वगैरे काढण्याचे प्रकार ह्यांचें विवरण पुस्तकाचे शेवटीं केलें आहे.

गणित करणारांपैकीं कित्येकांस इंग्रजी तारखांवरून गणित करण्यास बरें वाटेल, तर त्यांसाठीं दर ग्रहाचे कोष्टकांतील दुसरे कोष्टकाचे दोन भाग करून पहिले भागांत इसवी सनाप्रमाणें प्रतिवर्षीचे ग्रहाचे क्षेपक दिले आहेत. याक्षेपकांपासून ग्रह कसा साधावा हें दाखविण्यासाठीं खालचीं उदाहरणें पाहावीं ह्मणजे ध्यानांत येईल.

१ उदाहरण संन १८५० सांतील फेब्रुवारीचे १० वे तारखेचा मध्यम बुध काढ.

	रा०	अ०	क०
को० २ माग १, १८५० मध्यमबुध	१०°	२२°	२१·९
गति० फेब्रु १०=४१दिवस को० ३ रें.	५°	१७°	४७·३
मध्यम बुध	१६°	१०°	९·२

२ रें. उदा० सन १९६३ यांतील मार्च महिन्याचे १६ वे तारखेचा मध्यम बुध काढ.

१८६३ + १०० = १९६३; तसेंच. मार्च १६ = ज्या ३१ + फे० २८ + मा० १६ = ७५ दिवस.

	रा०	अं०	क०
को० २ रें. भाग १, १८६३ मध्यम बुध	१०°	१२°	५८·३
पुरवणी. १०० वर्षें	२°	१४°	४·२
को० ३ रें.- ७५ दिवस, घ्यावयाचे परंतु वरील शंभर वर्षांत एक वर्ष लीप नाहीं ह्मणून ७४	१०	२	५०·१
इच्छिला मध्यम ग्रह	१०°	२९°	५२·७

या कोष्टकांवरून इसवीसनाचे संबंधानें जे ग्रह येतात ते दोनप्रहरचे येतात. आणि शालिवाहन शकाचे संबंधानें जे ग्रह येतात ते प्रातःकाळचे येतात. इतकें गणितकारानें गणित करितांना लक्षांत ठेवावें. तसेंच गतिकरतांना व दिवस करतांना गेल्या तारखा तितके दिवस धरावे उदा० जानु० ५ वे तारखेस ५ दिवस धरावे, तसेच. फेब्रुवारीचे १० वे तारखेस जानु० ३१ आणि फेब्रु १० मिळून ४१ दिवस धरावे.

गुरु आणि शनि हे मोठाले ग्रह आहेत यामुळें त्यांचे स्थितीप्रमाणें ते एकमेकास अधिक कमी आकर्षण करुन एकमेकांच्या स्थितींत फेर पाडतात. याप्रमाणें लक्षांत धरण्याजोगें इतर ग्रहांस होत नाहीं ह्मणून, त्या ग्रहांचे कोष्टकांत आकर्षण प्रयुक्त संस्कार सोडून दिले आहेत; परंतु गुरु आणि शनि यांचे कोष्टकांत त्यापैकीं मोठमोठाले संस्कार दिले आहेत.

कोष्टक १.

पाहिजे त्यावर्षारंभींचे मध्यमबुध, बुधमंदोच्च, आणि क्षेपपात आणण्याचें.

शकारंभींचे क्षेपकांक.

	रा०	अं०	क०	
मध्यबुध, सायन	५	३	२५·१	मुंबईचे. रेखांशांचे.
बुध मंदोच्च, सायन........	७	१७	२६·७	
बुध क्षेपपात, सायन	०	२५	१४·२	

वर्षगति.

वर्ष संख्या.	मध्यम बुध.			बुध मंदोच्च.			बुध क्षेपपात.		
	रा०	अं०	क०	रा०	अं०	क०	रा०	अं०	क०
१	१	२४	४६·६	०	०	०·९	०	०	०·७
२	३	१९	३३·२	०	०	१·९	०	०	१·४
३	५	१४	१९·८	०	०	२·८	०	०	२·१
४	७	९	६·४	०	०	३·८	०	०	२·९
५	९	३	५३·०	०	०	४·७	०	०	३·६
६	१०	२८	३१·६	०	०	५·६	०	०	४·३
७	०	२३	२६·२	०	०	६·६	०	०	५·०
८	२	१८	१२·८	०	०	७·५	०	०	५·७
९	४	१२	५९·३	०	०	८·५	०	०	६·५
१०	६	७	४५·९	०	०	९·४	०	०	७·२
२०	०	१५	३१·८	०	०	१८·७	०	०	१४·४
३०	६	२३	१७·८	०	०	२८·१	०	०	२१·७
४०	१	१	३·७	०	०	३७·५	०	०	२८·९
५०	७	८	४९·७	०	०	४६·९	०	०	३६·१
६०	१	१६	३५·६	०	०	५६·२	०	०	४३·३
७०	७	२४	२१·५	०	१	५·६	०	०	५०·५
८०	२	२	७·५	०	१	१५·०	०	०	५७·८
९०	८	९	५३·४	०	१	२४·३	०	१	५·०
१००	२	१७	३९·३	०	१	३३·७	०	१	१२·२

मागील कोष्टक पुढें चालू.

वर्षगति.

वर्ष संख्या.	मध्यम बुध.	बुध मंदोच्च.	बुध क्षेपपात.
	रा० अं० क०	रा० अं० क०	रा० अं० क०
१००	२ १७ ३९.३	० १ ३३.७	० १ १२.२
२००	५ ५ १८.७	० ३ ७.५	० २ २४.३
३००	७ २२ ५८.०	० ४ २१.२	० ३ ३६.५
४००	१० १० ३७.४	० ६ १५.०	० ४ ४८.७
५००	० २८ १६.७	० ७ ४८.७	० ६ ०.८
६००	३ १५ ५६.०	० ९ २२.५	० ७ १३.०
७००	६ ३ ३५.४	० १० ५६.२	० ८ २५.२
८००	८ २१ १४.७	० १२ ३०.०	० ९ ३७.४
९००	११ ८ ५४.१	० १४ ३.७	० १० ४९.५
१०००	१ २६ ३३.४	० १५ ३७.५	० १२ १.७
१०००	१ २६ ३३.४	० १५ ३७.५	० १२ १.७
२०००	३ २३ ६.९	१ १ १५.०	० २४ ३.४
३०००	५ १९ ४०.३	१ १६ ५२.६	१ ६ ५.०
४०००	७ १६ १३.८	२ २ ३०.१	१ १८ ६.७
५०००	९ १२ ४७.२	२ १८ ६.६	२ ० ८.४
६०००	११ ९ २०.६	३ ३ ४५.१	२ १२ १०.१
७०००	१ ५ ५४.१	३ १९ २२.६	२ २४ ११.८
८०००	३ २ २७.५	४ ५ ०.२	३ ६ १३.४
९०००	४ २९ १.०	४ २० ३७.७	३ १८ १५.१
१००००	६ २५ ३४.४	५ ६ १५.२	४ ० १६.८

कोष्टक २.

भाग १ ला.

इसविसन् संबंधानें.

मध्यम बुध, मंदोच्च, आणि क्षेपपात यांचे प्रतिवर्षीचे क्षेपकांक.
काल मुंबईचे दोन प्रहर.

इसवी सन.	सायन मध्यम बुध.	मंदोच्च.	क्षेपपात.
	रा० अं० क०	रा० अं० क०	रा० अं० क०
१८००	३ १७ २२·५	८ १४ २०·९	१ १५ ५६·८
